सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०३ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


### महाराष्ट्र परिषदेने अमली पदार्थ तस्करांना मोक्का अंतर्गत आणण्यासाठी विधेयक मंजूर केले

# अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी मकोका कायद्यात सुधारणा: गृहराज्यमंत्री योगेश कदम

मुंबई: महाराष्ट्र विधान परिषदेने सोमवारी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यात (मकोका) सुधारणा एकमताने मंजूर केली, ज्यामुळे ड्रग्ज तस्कर आणि अंमली पदार्थांशी संबंधित गुन्हे त्याच्या कक्षेत येतात. ९ जुलै रोजी राज्य विधानसभेने या विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक मंजूर झाले. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर, सुधारित कायदा ड्रग्जशी संबंधित गुन्ह्यांवर कठोर उपाययोजना लागू करेल, ज्यामध्ये आरोपींना जामीन मिळवणे अधिक कठीण होईल.

अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी हे विधेयक निर्णायक ठरेल, अशी ठाम भूमिका राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत मांडली. राज्यात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कठोर पावले उचलण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम २०२५' (मकोका) कायद्यात सुधारणा करण्याचे विधेयक आज विधानपरिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सविस्तर मांडले आणि त्यामागील उद्देश अधोरेखित केला.

गृह राज्यमंत्री (शहरी) योगेश कदम यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २ जुलै रोजी विधान परिषदेत विधान केले होते की, सरकार सध्याच्या कायद्यांमध्ये सुधारणा करेल जेणेकरून ड्रग्ज



तस्करांवर कडक कायद्याअंतर्गत कारवाई केली जाईल. त्यानुसार या विधेयकात अंमली पदार्थ आणि मनोविकृतीजन्य पदार्थांचे उत्पादन, निर्मिती, मालकी, विक्री आणि वाहतूक या क्रियाकलापांना संघटित गुन्हेगारी म्हणून परिभाषित करण्याचा प्रस्ताव होता.

गृहराज्यमंत्री काय म्हणाले?

ही केवळ कायद्यातील तांत्रिक सुधारणा नसून, समाजाच्या रक्षणाची आमची जबाबदारी आहे. तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात सापडू नये, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. ही सुधारणा अमली पदार्थांच्या तस्करीसाठी जबाबदार असलेल्या संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाईसाठी मार्ग मोकळा करणार आहे.

महत्त्वाच्या सुधारणा

मकोका कायद्यातील सुधारणा अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांना 'संघटित गुन्हेगारी' म्हणून परिभाषित करेल. त्यामुळे NDPS कायद्यातील प्रकरणांवर आता मकोका अंतर्गत कठोर कारवाई शक्य होईल. मागील पाच वर्षांत राज्यात ७३,००० अमली पदार्थ गुन्हे नोंदवले गेले असून, १०,००० कोटींपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या सुधारित कायद्यानुसार अमली पदार्थांच्या उत्पादन, वाहतूक, वितरण व तस्करीमध्ये सहभागी असलेल्या टोळ्यांवर कठोर प्रतिबंध लावता येणार असून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित होणार आहे. राज्यात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या गैरवापरामुळे तरुण पिढीचे आरोग्य आणि समाजव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत. ही समस्या रोखण्यासाठी सरकार सजग असून कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी वचनबद्ध आहे. अंमली पदार्थ विरोधी या लढाईत सभागृहातील सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिल्याने सर्व सदस्यांचे मनापासून आभार मा. मंत्री योगेश कदम यांनी मानले.

# बाल गुन्हेगारांच्या कायदेशीर संज्ञेत बदल होणार; वय १६ ऐवजी १४ करणार - मुख्यमंत्री

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे विधानसभेत सूतोवाच

मुंबई - अमली पदार्थ तस्करी आणि बाल गुन्हेगारी विरोधात कठोर पाऊले उचलण्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. बाल गुन्हेगारांच्या कायदेशीर संज्ञेतील वयोमर्यादा १६ वरून १४ पर्यंत कमी करण्याबाबत अभ्यास सुरू असल्याचे त्यांनी सोमवारी विधानसभेत स्पष्ट केले. तसेच, अमली पदार्थ तस्करीच्या प्रकरणांमध्ये मकोका कायद्याचा वापर अधिक प्रभावीपणे करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवसेनेचे आमदार विलास संदिपान भुमरे यांनी छत्रपती संभाजीनगरमधील ड्रग्ज रॅकेटचा मुद्दा उपस्थित करत आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाईची मागणी करणारी लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. संभाजीनगर ड्रग्जचे हब बनले असून, अनेक भागात खुलेआम ड्रग्जची विक्री



होत असल्याचे त्यांनी सांगितले. एका पीडित मुलीच्या आईने दामिनी पथकाकडे आपल्या मुलीला ड्रग्जच्या विळख्यातून बाहेर काढण्याची विनवणी केल्याचे उदाहरणही त्यांनी दिले. वाळूज पोलीस ठाण्यात ड्रग्ज प्रकरणी अटक केलेल्याला 'नॉनव्हेज पार्टी' दिल्याच्या घटनेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

या लक्षवेधी सूचनेवर आ. वरुण सरदेसाई यांनी उपप्रश्न उपस्थित करत, अज्ञान बालकांकडून होणाऱ्या अमलीपदार्थ तस्करीचा मुद्दा मांडला. त्यांच्यावर कारवाईसाठी कायद्यात काही बदल केले जातील का, अशी विचारणा त्यांनी केली. तसेच, आंतरराष्ट्रीय गुन्हेगार आणि बेहरामपाडा भागात मुस्लीम वस्तीत पोलीस कारवाईसाठी जात नाहीत, त्यांच्यावर कारवाई करणार का, असाही प्रश्न त्यांनी विचारला. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अज्ञान बालकांना ड्रग्ज तस्करीसाठी वापरले जात असल्याचे मान्य केले. ते म्हणाले की, बलात्काराच्या प्रकरणांमध्ये केलेल्या बदलांप्रमाणे, ड्रग्ज पेडलिंगमध्ये सहभागी असलेल्या बालकांच्या वयोमर्यादेत बदल करता येईल का, याचा अभ्यास सुरू आहे. अज्ञान बालकांना पकडून त्यांच्यामार्फत हे गुन्हे चालतात, त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप पाहून आवश्यक ते बदल केले जातील. मुंबईतील बेहरामपाडा भागात ड्रग्ज व्यावसायिकांवर धडक कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# समोसा-जिलेबी आवडीने खाणाऱ्यांसाठी नागपुरात 'धोक्याचा इशारा'चे बोर्ड लागले!

नवी दिल्ली: फास्ट फूड आरोग्यासाठी घातक आहे, हे तज्ज्ञ नेहमीच सांगतात. पण आता आपल्या आवडत्या समोसा आणि जिलेबीचा समावेश थेट आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या यादीत होणार आहे. यावर आता केंद्रीय आरोग्य मंत्रालयानेच मोठं पाऊल उचललं आहे.

समोसा, जिलेबी आणि 'चाय-बिस्कीट' म्हटलं की अनेकांच्या तोंडाला पाणी सुटतं. पण या पदार्थांमुळे गंभीर आजार होऊ शकतात, असा इशारा आरोग्य मंत्रालयाने दिला आहे. ज्याप्रमाणे तंबाखू आणि सिगारेटच्या पाकिटांवर धोक्याचा इशारा दिला जातो, त्याचप्रमाणे आता समोसा आणि जिलेबीबाबतही असेच केले जाणार आहे. याच नियमाचे



पालन करत नागपूरमध्ये समोसा आणि जिलेबीच्या दुकानांबाहेर 'सावधानता बाळगून खा, तुमचं भविष्य तुमचे आभार मानेल' अशा आशयाचे बोर्ड लावण्यात आले आहेत.

'तंबाखूपेक्षाही घातक'

आरोग्य मंत्रालयाने एम्स नागपूरसह सर्व केंद्रीय संस्थांना असे पोस्टर त्यांच्या आवारात लावण्याचे आदेश दिले आहेत. जेणेकरून लोकांना त्यांच्या दररोजच्या नाश्त्यामध्ये किती प्रमाणात फॅट आणि साखर आहे, जी शरीरासाठी हानिकारक आहे, हे स्पष्टपणे कळेल. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, स्नॅक्समधून शरीरात जाणारी साखर आणि ट्रान्स फॅट हे तंबाखूइतकेच हानिकारक असू शकतात. त्यामुळे लोक काय खात आहेत, याची त्यांना माहिती असणे गरजेचे आहे.

एम्स नागपूरच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, लाडू, वडापाव, भजी या सर्व स्नॅक्सची सध्या तपासणी केली जात आहे. लवकरच कॅफेटेरिया आणि सार्वजनिक ठिकाणी याबाबत बोर्ड लावले जातील. मधुमेह तज्ज्ञांनी स्पष्ट केले की, सरकार या पदार्थांवर बंदी आणत नसून, लोकांना त्यांच्या आरोग्याविषयी सतर्क करत आहे. आजच्या परिस्थितीत सर्वाधिक आजार चुकीच्या आहारातून होत असल्याने, सरकारला हे करणे गरजेचे आहे.

### महसूल खात्यातील १२ वरिष्ठ अधिकाऱ्यांना केंद्राकडून मिळाला IAS दर्जा

मुंबई: महाराष्ट्रातील महसूल विभागातील १२ वरिष्ठ अधिकाऱ्यांना लोकसेवा आयोगाकडून पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानुसार राज्याच्या महसूल सेवेतील ज्येष्ठ अधिकाऱ्यांना आज आयएएस कॅडरचा दर्जा देण्यात आल्याची अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. केंद्र सरकारच्या पर्सनल, पब्लिक ग्रीवन्सेस अँड पेन्शन मंत्रालयाच्या पर्सनल व ट्रेनिंग विभागाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली. दरम्यान, १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील रिक्त असलेल्या जागांवर या १२ नवीन आयएएस अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे. यासंदर्भात, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासकीय सेवेत पदोन्नती मिळालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# शिवसेनेबरोबर युतीबाबत नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये निर्णय करू - राज ठाकरे

### मनसेचे प्रदेश स्तरावरील शिबिर सुरू, निवडक पदाधिकारी उपस्थित बंद दाराआड चर्चा

इगतपुरी : आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच शिवसेनेसोबत (उबाठा) युती करावयाची की नाही, याबाबत मनसेच्या राज्यस्तरीय शिबिरात चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यानुसार शिवसेनेसोबत युतीबाबत नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात निर्णय करू, असे सुतोवाच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केल्याचे समजते. इगतपुरी येथील कॅमल व्हॅली रिसॉर्टमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तीन दिवसीय राज्यस्तरीय शिबिराला सुरुवात झाली. या शिबिरामध्ये मनसेचे काही निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे या शिबिरामध्ये



प्रसिद्धी माध्यमांना सहभागी करून न घेता सुरुवात झाली असून राज्यातून शेकडो पदाधिकारी या ठिकाणी दाखल झालेले आहेत.

इगतपुरीमध्ये सर्वात जास्त पाऊस पडत असताना देखील या पावसाच्या मोसममध्ये कॅमल व्हॅली रिसॉर्टमध्ये मात्र गरमागरम वातावरण आहे. या ठिकाणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पुन्हा एकदा बंद दाराआड खलबते शिजत असून या खलबत्यात नक्की काय आहे, याबाबतची माहिती मात्र बाहेर पडू नये याची पूर्णपणे काळजी घेतली जात आहे. राज्यभरातून जिल्हाप्रमुख पक्षाचे प्रदेश स्तरावरील नेते आणि काही निवडक पदाधिकाऱ्यांना सहभागी करण्यात आलेला आहे.

या शिबिरासाठी पक्षाचे युवा नेते अमित ठाकरे हे दुपारी दाखल झाले तर पक्ष अध्यक्ष राज ठाकरे हे चार वाजेच्या सुमारास इगतपुरीमध्ये दाखल झाले. त्यानंतर येथील बैठकांना सुरुवात झाली. त्यापूर्वी सर्व पदाधिकारी हे या ठिकाणी दाखल झालेले होते. १६ जुलैपर्यंत हे शिबिर या ठिकाणी सुरू राहणार आहे. शिबिरासाठी कुठल्याही प्रकारची बॅनरबाजी किंवा प्रसिद्धी करण्यात आलेली नाही. प्रसिद्धी माध्यमांना देखील या शिबिरापासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने लांबच ठेवलेले आहे.

# सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाला अधिक सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार : आ. अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१४ जुलै

खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जावू देणार नाही असे स्पष्ट करीत सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाला अधिक सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांनी सोयगाव तालुक्यातील बनोटी येथे व्यक्त केले.

नुकत्याच झालेल्या तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत शेतकरी सहकार विकास पॅनलचे १७ पैकी १३ उमेदवार निवडून आले.त्यानिमित्ताने बनोटी येथील श्री. अमृतेश्वर गोमुख देवस्थान



येथे आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार,मतदारांचे आभार व स्नेह भोजन कार्यक्रम पार पडला.याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.

याप्रसंगी शिवसेनेचे उबाठा चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र राठोड, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे,शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे,शिवसेना (उबाठा) सोयगाव तालुका अध्यक्ष दिलीप मचे,सिल्लोड मारोती पा.वराडे,कृउबा समितीचे संचालक दारासिंग चव्हाण,सतीश ताठे,शिवअप्पा चोपडे,ध्रुपताबाई सोनवणे,सुरेखा तायडे,नवनिर्वाचित संचालक संजय निकम,सुभाष बोरसे,मुरलीधर वेहळे,भगवान लहाने,राधेश्याम जाधव, रंगनाथ वराडे,चंदाबाई राजपूत,प्रतिभा सोळुंके,भारत तायडे, मोतीराम तेली तसेच स्वप्नील पाटील,अतुल बोरसे,सुभाष वाडकर, सागर पाटील,अभयसिंग पवार,मंगेश पाटील, धरमसिंग सोळुंके,कुणाल राजपूत,विजू नगरे,सुपडू पाटील, अनिल सोळुंके आदींसह मतदार व परिसरातील शेतकरी, गावकरी उपस्थित होते.पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की,सोयगाव तालुक्यातील सहकार क्षेत्राच्या विकासासाठी कायम प्रयत्न केले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात विकास कामे करण्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी दिला.त्यानंतर बनोटी व इतर ठिकाणच्या उपबाजाराच्या विकासासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देवू असे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले. इतरत्र सहकार क्षेत्र डबघाईला येत असतांना सोयगाव मध्ये मात्र सहकार क्षेत्राचा सातत्याने विकास होत आहे.सोयगाव तालुक्यात विकासाच्या माध्यमातून बाजार समितीचा होत असलेला विकास त्यासोबतच जिनिंग प्रेसिंग, व फळबाग - भाजीपाला प्रकल्प येथे लवकरच सुरू होणार असल्याने याचा फायदा खरेदी विक्री संघाला होईल.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक तयारीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.१४ : विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचा जिल्हानिहाय आढावा घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मतदान केंद्राची संख्या निश्चित करताना काळजीपूर्वक निश्चित करा, असे निर्देश त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीला अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरविकास विभागाचे सह आयुक्त देविदास टेकाळे, सहायक आयुक्त संजय केदार तसेच दुरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी यांच्यासह नगरप्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी जिल्हानिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीबाबत माहिती जाणून घेतली. मतदार संख्या, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम), मतदान केंद्रांची व्यवस्था आणि इतर अनुषंगिक तयारी मतदान केंद्रांची रचना आणि निवडणूक प्रक्रियेच्या तयारी, मतदान केंद्रांवर पाणी, वीज, स्वच्छतागृहे यासारख्या मूलभूत सुविधा,

ईव्हीएम सुरक्षितता आदी तयारीचा आढावा घेत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित व्यवस्थेची पाहणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी सबंधित विभागाचे अधिकारीही उपस्थित होते.

### हरियाणा आणि गोव्यासाठी नव्या राज्यपालांची तसेच लडाखसाठी नव्या नायब राज्यपालांची नियुक्ती

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवार १४ जुलै रोजी हरियाणा आणि गोव्यासाठी नव्या राज्यपालांची तसेच लडाखसाठी नव्या नायब राज्यपालांची नियुक्ती केली. प्रोफेसर असीम कुमार घोष यांना हरियाणाच्या राज्यपालपदी नियुक्त करण्यात आले. पुष्पपति अशोक गजपति राजू यांना गोव्याच्या राज्यपालपदी नियुक्त करण्यात आले. राष्ट्रपतींनी लडाखचे सध्याचे नायब राज्यपाल ब्रिगेडियर (डॉ.) बी.डी. मिश्रा (निवृत्त) यांचा राजीनामा स्वीकारत त्यांना जबाबदारीतून मुक्त केले. तसेच भाजपाच्या कविंद्र गुप्ता यांना लडाख या केंद्रशिसातित प्रदेशाच्या नायब राज्यपालपदी नियुक्त केले. सध्या बंडारू दत्तात्रेय हरियाणाचे आणि पीएस श्रीधरन पिल्लई गोव्याचे राज्यपाल आहेत. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने जारी झालेल्या आदेशपत्रामुळे प्रोफेसर असीम कुमार घोष हे बंडारू दत्तात्रेय यांच्याकडून हरियाणाच्या राज्यपालपदाचा पदभार स्वीकारणार आहेत. तसेच पुष्पपति अशोक गजपति राजू हे पीएस श्रीधरन पिल्लई यांच्याकडून गोव्याच्या राज्यपालपदाचा पदभार स्वीकारणार आहेत. याआधी रविवार १३ जुलै रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चार सदस्यांना राज्यसभेत खासदार म्हून नामनिर्देशित केले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रश्न समजून घेण्यास मदत व्हावी या उद्देशाने राष्ट्रपतींकडून विविध क्षेत्रातील निवडक मान्यवरांना राज्यसभेवर नामनिर्देशित केले जाते. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ वकील उज्ज्वल देवराव निकम, केरळमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मस्ते, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि प्रख्यात इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांना राज्यसभेसाठी नामनिर्देशित केले आहे.

# मन, शरीर व आत्म्याचा समतोल साधणारी जीवनपद्धती आत्मसात करावी - सभापती प्रा.राम शिंदे

### हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न

अहिल्यानगर, दि.१३ - आधुनिक जीवनशैलीत मन, शरीर व आत्म्याचा समतोल साधणारी सकारात्मक जीवनपद्धती आत्मसात करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी येथे केले.

मानकन्हैया ट्रस्ट व आनंदऋषी हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राजयोगा जीवनपद्धतीच्या अभ्यासक डॉ. सुधाताई कांकरिया लिखित हृदय आयोग्याच्या गप्पागोष्टी या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या वेळी आमदार संग्राम



जगताप, पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, डॉ. रतन राठोड, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. सुनिल म्हस्के, बि.के. निर्मला दिदी, अभय आगरकर, डॉ. वसंत कटारिया, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, लेखिका डॉ. सुधा कांकरिया, डॉ. वर्धमान कांकरिया यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुस्तकात केवळ शारीरिक नव्हे तर मन, शरीर व आत्म्याच्या संतुलनावर आधारित आरोग्यदृष्टीकोन मांडण्यात आला आहे. आधुनिक जीवनशैलीतही सकारात्मक व निरोगी जीवन जगता येईल, यावर मार्गदर्शन करणारे हे पुस्तक सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असेही प्रा. शिंदे यांनी सांगितले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात डॉ. सुधाताई कांकरिया यांनी मांडलेले विचार हे अंतर्मुख करून आरोग्यदृष्टीने नवा दृष्टीकोन देणारे आहेत, असे सांगत त्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच, डॉ. कांकरिया यांचे नाव नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकित झाल्याचा उल्लेख करत त्यांचे अभिनंदन केले.

# वडवाळीच्या बालाजी मंदिरात चोरी

तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ : पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र वडवाळी येथील बालाजी मंदिरात चोरी झाल्याची घटना रविवार दिनांक १३ जुलै रोजी मध्यरात्री घडली आहे. मराठवाड्याचा बालाजी म्हणून ओळख असलेल्या प्राचीन हेमाडपंथी बालाजी मंदिरात दानपेटी फोडून चोरट्यांनी ३० हजार रुपये चोरून नेल्याची फिर्याद पैठण पोलीस ठाण्यात दिली आहे.



परसराम अर्जुन खोपडे या गावकऱ्याच्या तक्रारीवरून पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक महादेव गोमारे यांनी दिली. विशेष म्हणजे या मंदिरातील दानपेटी यापूर्वी अनेक वेळा चोरट्यांनी फोडली आहे. दानपेटी फोडल्याच्या पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्यानंतर देखील या चोरट्यांचा कधीच पोलिसांना तपास लागला नाही.

अशाच प्रकारची चोरी रविवार दिनांक १३ जुलै रात्री व सोमवार दिनांक १४ जुलै च्या पहाटे घडल्याची माहिती दर्शनासाठी मंदिरात आलेल्या भाविकाच्या लक्षात आली. या तक्रारीवरून पैठण पोलीस ठाण्यात विविध कलमाने गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांच्या वतीने तपास सुरू आहे.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांचा मुख्य सूत्रधार शोधून कार्यवाही करा


**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ जुलै -**

मराठा सेवा संघ प्रणित संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर दि.१३ जुलै रोजी अक्कलकोट येथे हिंदुत्ववादी संघटनेच्या दिपक काटे व सोबत असलेल्या समूहाने शाईफेक करून मारहाण करण्याचा प्रयत्न केला आहे.

या घटनेच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने निलंगा येथील उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. मराठा बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्य खर्ची घालणाऱ्या व्यक्तींवर असा जीवघेणा हल्ला करणाऱ्या लोकांवर कठोर कारवाई करावी व या घटनेतील मुख्य सूत्रधार कोण आहेत याचा शोध घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर ईश्वर पाटील, हरिभाऊ सगरे, प्रमोद कदम, विनोद सोनवणे, प्रदीप कदम, विशाल जोळदापके, राजाभाऊ साळुंके, सतिष फट्टे, सचिन पवार, वैभव गोमसाळे, किरण पाटील, धीरज शिंदे, राहुल बिराजदार, बरमदे, भगवान जाधव, संजय इंगळे, माधव वाडीकर, संजीव आकडे,रितेश तांबोळे, अर्जुन जाधव, पृथ्वीराज जाधव आदींच्या स्वाक्षरी आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### अनन्या देशपांडे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**उदगीर, दि.१४ जुलै -**

येथील अनन्या स्मिता सुनीत देशपांडे ही विद्यार्थिनी शिष्यवृत्ती परीक्षेत २३४ गुण घेऊन उत्तीर्ण होत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे. यापूर्वी तिने नवोदय परीक्षेतही यश संपादन केले आहे. अनन्या देशपांडे हिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

### उपविभागीय अधिकारी शिंदे व दाभाडे-शिंदे यांची हत्तीबेटास भेट

**उदगीर, दि.१४ जुलै -**

उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व धर्माबाद च्या उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे-शिंदे या सपत्नीक जोडीने हत्तीबेट पर्यटन स्थळास भेट देवून हत्तीबेट गडावर वृक्षारोपण केले. उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व स्वाती दाभाडे-शिंदे यांनी हत्तीबेट गडावर पर्यटन व वन विभागाच्या वतीने सुरू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली व निसर्ग पर्यटनाचा आनंद घेतला. हत्तीबेट पर्यटन विकास समितीचे व्ही. एस. कुलकर्णी, ज्योती बानापुरे, सुनंदा सरदार, रणजित बानापुरे, मयूर कुलकर्णी, सचिन सूर्यवंशी, गणेश चव्हाण यांनी उपविभागीय अधिकारी द्वयांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार केला.

## मान्सून गायब : नुसतेच वारे; शेतकरी हवालदिल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१४ जुलै -**

ज्या मान्सूनकडे डोळे लावून बसलेला शेतकरी वर्ग हक्काने आकाशाकडे पाहतोय, तो मान्सून अद्यापही गायब आहे. हवामान खात्याने जूनच्या दुसऱ्याच आठवड्यात पावसाची शक्यता वर्तवली होती त्यानुसार काही भागात हलकासा तर काही भागात जोरदार पाऊस झाला आणि त्या आधारावर वलांडी व परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या उरकून घेतल्या. मात्र त्यानंतर तब्बल आठवडा उलटूनही पावसाचा पत्ता नाही. ढगाऐवजी फक्त वारेच वाहत आहेत, त्यामुळे पेरलेल्या बियानाचं काय होणार, ते उगवतील काय आणि उगवलेली पिके कशी जगतील यां चिंतेत शेतकरी आहे.

वलांडी परिसरातील काही भागात मूग, उडीद, तूर, आणि सोयाबीनची पेरणी करण्यात आली आहे. पण मान्सूनचा खंड आणि उष्णतेची लाट यामुळे जमिनीत ओल राहिलेली नाही. बियाणं मातीत आहे, पण उगमच होत नाही. जिथे अंकुर फुटले तिथे ते आता वाळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे दुबार पेरणीची शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चातही भर पडणार आहे.

दररोज सकाळ-संध्याकाळ ढगांच्या आभाळातून पावसाच्या आशा निर्माण होतात, पण नंतर हवामान पुन्हा कोरडं होतं.

दिवसभर नुसतं वारे फुकत आहे. शेतकरी सायंकाळी ढगावर डोळे ठेवून असतो, पण प्रत्येकवेळी निराशाच पदरात पडत आहे.

> खत, बी, पेरणीसाठी ट्रॅक्टर सगळं उधारीवर घेतलं. मातीत ओलावा होता म्हणून पेरणी केली, पण आता पाऊस नाही. दुसऱ्यांदा पेरणी करावी लागली तरशेतकऱ्यांना कसं काय परवडणार शेती?
> **- शमसुद्दीन जमींनदार, शेतकरी वलांडी**

## राष्ट्रीय महामार्गावर बसच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ जुलै -**

तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर टाका पाटी येथे सोमवारी सकाळी झालेल्या बस - दुचाकी अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू तर एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.या अपघातानंतर बस राष्ट्रीय महामार्गलगत असलेल्या रोहित्रीवर धडकत असताना चालकाच्या प्रसंगावधानामुळे नियंत्रणात ठेवण्यात यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. सदरील ठिकाणी सातत्याने अपघात घटना घडत आहेत ज्यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे सदरील अपघाताच्या वाढत्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

औसा - तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर सकाळी ८ वाजता सोलापूर - देगलूर (एम एच २० बीएल ३८५४) हि देगलूर च्या दिशेने जात असताना शेतीमधील औजारे पाहण्यासाठी मोटारसायकलवरून टाका गावाकडे जाणाऱ्या मोटारसायकल (एम एच २४-एएल ३६६२) ला धडक दिल्याने या अपघातात प्रकाश निवृत्ती पवार (वय ५४ रा माळुंब्रा ता.औसा) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अभिमन्यू कांबळे (वय ६० रा बेलकुंड) हे गंभीर जखमी झाले आहेत.

या अपघातानंतर घटनास्थळाचा पंचनामा भादा पोलिसांनी केला असून मयत प्रकाश पवार यांचे बेलकुंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले आहे.

याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## प्रा.गिरी संजय यांच्या हस्ते नवीन लाल परीचे मुरूम येथे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जुलै -**

प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुरूम यांच्या विनंतीला मान देत उमरगा-भुयार-चिंचोली मार्गे मुरूम बस सेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

या नव्या लाल परीचे मुरूम येथे प्रा. गिरी संजय यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या प्रसंगी मोठ्या उत्साहात बसचे स्वागत करण्यात आले.

उमरगा आगारात नुकत्याच आलेल्या पाच नव्या बसेसपैकी एका बसचे पूजन करण्यात आले.

## ढाळेगाव येथील श्री नारायणजी आप्पा संजीवन समाधी दर्शन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१४ जुलै -**

अहमदपूर तालुक्यातील श्रीक्षेत्र ढाळेगाव येथे आषाढी पौर्णिमेनिमित्त श्री नारायणजी आप्पा महाराज यांच्या संजीवन समाधीचा भव्य दर्शन सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. हजारो भाविकांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने दिंडी सोहळा, नगर प्रदक्षिणा, हरिकीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम उत्साहात साजरे करण्यात आले.

या सोहळ्याचे नेतृत्व ह.भ.प. डॉ. पांडुरंग महाराज कदम यांनी केले. सोहळ्याची सुरुवात श्री नारायणजी आप्पा महाराज मंदिरापासून दिंडी सोहळ्याने झाली. श्रीक्षेत्र ढाळेगाव पंचक्रोशीत 'प्रति पंढरपूर' म्हणून प्रसिद्ध आहे. आषाढ महिन्यात चतुर्दशीला नगर प्रदक्षिणा, संध्याकाळी हरिकीर्तन, तर पौर्णिमेच्या दिवशी संत नारायण आप्पा महाराज यांच्या पादुका व मुखवटा पालखीत विराजमान करून नगर प्रदक्षिणा काढली जाते. एकादशीला ह.भ.प. चाटे महाराज गोळेवाडीकर यांचे कीर्तन, द्वादशीला ह.भ.प. मधुकर महाराज यांची कीर्तन सेवा, तसेच हरीभक्त परायण लक्ष्मण महाराज ढाळेगावकर, गोपाळदेव महाराज ढाळेगावकर व मधुकर महाराज मोहगावकर यांच्या कीर्तन सेवाही उत्स्फूर्तपणे पार पडल्या.

दुपारी छत्री व अब्दागिरीसह गादीचे विद्यमान वंशज डॉ. पांडुरंग महाराज यांच्या नेतृत्वाखाली दिंडी सोहळा मंदिरातून प्रस्थान करून नगर प्रदक्षिणा झाली. हनुमान मंदिराच्या मागील मैदानात महिलांनी व वारकऱ्यांनी फुगडी, हमामा, शिवना पाणी यांसारखे पारंपरिक खेळ खेळून रिंगण सोहळा पार पाडला. यानंतर दिंडी श्रीच्या मंदिरासमोर येऊन आरतीने सांगता झाली.

या सोहळ्यात गावकरी मंडळ व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

सोहळा यशस्वी करण्यासाठी मंदिर समिती अध्यक्ष डॉ. पांडुरंग महाराज कदम, सचिव लक्ष्मण कदम महाराज, उपाध्यक्ष बाबुराव कदम, संजय आलापुरे, रावसाहेब शेकडे, रामनाथ बणे, वैजनाथ हंडे, परगे व्यंकटराव आयनीले, हरिश्चंद्र शेकडे, धनंजय महाराज शेकडे, धनंजय महाराज कोत्तावार यांनी परिश्रम घेतले.

## रानमाळच्या जुगार अड्ड्यावर पुन्हा पोलिसांचा छापा; ३७ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१४ जुलै -**

उदगीर तालुक्यातील देवणी पोलीस ठाणे हद्दीतील मोघा शिवारातील एका बंद जागेवर सुरु असलेल्या तिर्रट नावाच्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी रविवारी रात्री १०.४० च्या सुमारास छापा टाकत ३७ जणांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ५,१९,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशावरून व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. छाप्यादरम्यान ३७ आरोपी तिर्रट नावाचा जुगार रुपये लावून खेळत असताना पकडले गेले. त्यांच्याकडून २,४५,००० रुपये रोख रक्कम, २,७४,५०० रुपये किमतीचे मोबाईल असा एकूण ५,१९,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणातील प्रमुख आरोपींमध्ये भालकी, बिदर, हुमनाबाद, औराद, निलंगा, देवणी, उदगीर, नांदेड, हैद्राबाद व रंगारेड्डी येथील व्यक्तींचा समावेश असून, सदर जुगार क्लब चालवणारा वजीर महेबुबसाब बंगाली (रा. उदगीर) व क्लबच्या जागेचे मालक शिवाजी अण्णाराव नेमताबादे (पाटील) यांच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे.

## ज्ञानदानाचे कार्य पवित्र : ना. बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१४ जुलै -**

ज्ञानदानासारखे पवित्र कार्य कुठलेही नसून त्या ज्ञानाची वाटणी करता येत नाही असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी लातूर येथे केले.

लातूर येथील प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी येथील नीट, जेईई, एम एच सि ई टी, परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते येथील मधुरिमा फंक्शन हॉल येथे संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी मंत्री संजय बनसोडे, शिवराज मोटेगावकर, नीलम मोटेगावकर, बबन भोसले,तुकाराम पाटील , निलेश राजमाने, सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की भविष्यातील डॉक्टर्स, इंजिनियर्स चा सत्कार आमच्या हस्ते होणं हे हे मोठे भाग्याचे असून, सर्व गुणवंतांचं कौतुक असून ज्यांना मार्क कमी पडले त्यांनी सुद्धा निराश होऊ नये असे ते म्हणाले. पालकांनी मुलांसोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना काम करू देणे आवश्यक आहे त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना कधीही विसरू नये असेही पाटील म्हणाले.

प्राध्यापक शिवराज मोटेगावकर यांची आरसीसी विद्यार्थी घडवणारी संस्था असून त्यांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवून एक वेगळा पायंडा ते पाडत असल्याचे सुद्धा त्यांनी गौर्वोदगार काढले. शेतकरी हा आपल्या देशाचा आत्मा असून शेतकऱ्यांना कधीही कमी समजू नये शेतकरी हा शेतीचा डॉक्टर आहे. कुठल्याही क्षेत्रात गुरु महत्त्वाचा असून प्रामाणिक काम केलं तर आपल्याला सर्वोच्च शिखरावर जाता येतं. कोणाची नक्कल केल्यास माणूस मोठा होत नाही असेही मत नामदार पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

राज्याचे सहकार मंत्री आमदार बाबासाहेब पाटील यांचा आरसीसीने भव्य असे स्वागत केलं. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या पूजनेने करण्यात आली. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी राज्याचे माजी मंत्री आ. संजय बनसोडे, तुकाराम पाटील, नीलम मोटेगावकर, शिवराज मोटेगावकर यांनी समयोजित मनोगत व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध अभिनेता बालाजी सुळ यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## हरणांच्या उपद्रवामुळे शेतकरी दुहेरी संकटात

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ जुलै -**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव, हिप्पळगाव, रापका गणेशवाडी, कांबळगा, आरी, उमरदरा, दैठणा, डीगोळ, येरोळ, साकोळ आदी शिवारातील शेतकरी सध्या दुहेरी संकटाचा सामना करत आहेत. खरिपाच्या हंगामात पेरणी केलेल्या सोयाबीन व तूर पिकांची उगवण झाल्यानंतर हरणांच्या कळपांनी ही कोवळी व लुसलुशीत पाने खाऊन पिकांचे मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हतबल झाला आहे.

यंदा रिमझिम पावसावर पेरण्या केल्यानंतर पावसाने उघडीप दिल्याने हलक्या जमिनीत ओल कमी झाली आणि बियाणे उगवले नाहीत. परिणामी, अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. आता उगवलेल्या सोयाबीन व तूर पिकांच्या वाढीस सुरूवात झाल्यावर हरणांच्या कळपांनी शेतात शिरून पिके फस्त करणे सुरू केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे. फक्त हरणांचाच नव्हे, तर गोगलगाय व रानडुकऱ्यांचाही प्रचंड प्रादुर्भाव झाला असून हे वन्यजीव पिकांच्या मुळासकट पानांवर ताव मारत आहेत. त्यामुळे शेतीची आणखी पडझड होत आहे. या वन्यजीव प्राण्यांना पकडण्यासाठी किंवा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाकडे कोणतीही ठोस यंत्रणा नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. वन विभागाच्या नियमांनुसार या प्राण्यांना मारता किंवा पकडता येत नसल्याने शेतकरी रोज होणाऱ्या नुकसानीमुळे चिंताग्रस्त आहेत.

शेतकरी वर्ग सध्या वाढत्या पिकांच्या खर्चामुळे आणि वन्यजीवांच्या हल्ल्यामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## गुंतवणुकीसाठी आर्थिक साक्षरता व सुरक्षितता महत्त्वपूर्ण : मांगदरे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ जुलै -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळा उत्साहात पार पडली. आर्थिक गुंतवणूक करताना आर्थिक साक्षरता व सुरक्षितता महत्त्वाची असून जीवनातील आर्थिक चढ-उतारांना संयमाने सामोरे जाणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन एन. जे. वेल्थ, छत्रपती संभाजीनगरचे शाखा व्यवस्थापक नारायण मांगदरे यांनी यावेळी केले

महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग व वेल्दी ट्रिक्स म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्युटर, औराद शहाजानी यांच्या संयुक्त विद्यमाने या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार होते. कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र ग्रामीण बँक, कासार बालकुंदाचे शाखा व्यवस्थापक सुनीलकुमार दांडे यांच्या हस्ते झाले.

यावेळी नारायण मांगदरे यांनी म्युच्युअल फंड, सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एस.आय.पी.), इन्फ्लेशन, नोशनल लॉस आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रियांका वलांडे (एम. आय. टी. कॉलेज, पुणे) यांनी डी मॅट अकाउंटची माहिती दिली, तर प्रमोद बिरादार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान कदम यांनी केले, तर सरस्वती स्तवन प्रा. दुर्गादास सबनीस यांनी सादर केले. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. मोहन बंडे यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. विकास कुलकर्णी यांनी मानले.

## हरित धाराशिव अभियान वृक्ष लागवड सृष्टीचा सोहळा म्हणून साजरा करावा : जिल्हाधिकारी पुजार

### १९ जुलै रोजी जिल्हयात होणार १५ लक्ष वृक्ष लागवड...

### जिल्हावासियांना जागतिक विक्रम करण्याची संधी उपलब्ध...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जुलै -**

जिल्ह्यामध्ये वृक्षांचे प्रमाण वाढावे, जिल्हा वृक्षांनी आच्छादित व्हावा व त्या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल राखता यावा यासाठी वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या १९ जुलै रोजी जिल्ह्यातील २९४ ठिकाणच्या ५ हजार ७०२ आर क्षेत्रावर १५ लक्ष विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे यामध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग राहणार असून प्रत्येकांनी ते झाड आपले आहे या भावनेने कुटुंबासह येऊन सहभागी होत वृक्षारोपण करावे.तसेच रोपण केलेल्या वृक्षासोबत आपल्या आईसह कुटुंबासमवेत सेल्फी काढणे आवश्यक आहे.

लावलेले वृक्ष ही सरकारी मोहीम न समजता स्वतःच आपल्या व भावी पिढीच्या फायद्यासाठी त्याची कशी जपवणूक होईल याची काळजी घ्यावी.

त्यासाठी हरित धाराशिव महोत्सव म्हणजेच वृक्ष लागवड हा सृष्टीचा सोहळा साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हा प्रशासन आणि उत्स्फूर्त लोकसहभागातून हरित धाराशिव अभियान, एक पेड माँ के नाम, संकल्प वृक्षरोपणाचा एका दिवसात १५ लक्ष वृक्षांचा या अंतर्गत हरित धाराशिव अभियान संदर्भात आढावा बैठकीचे आज आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी जिल्हाधिकारी पुजार बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीण धरमकर, विभागीय वन अधिकारी बी.एस. पोळ, सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी व्ही.के. करे, उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, पालकमंत्री, खासदार आमदार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते व त्यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करावी असे आवाहन त्यांनी केले.

खड्ड्यामध्ये कंपोस्ट खत नसेल तर मळी किंवा बग्यास वापरावा असे सांगूनपुजार म्हणाले की, वृक्ष लागवडीमध्ये नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व तालुका कृषी अधिकारी यांनी गावकऱ्यासमवेत बैठक घ्यावी. बैठक घेतल्यास गावकऱ्यांना देखील प्रेरणा मिळून ते देखील आपोआप सहभागी होतील व त्यांच्या सहकार्यानेच वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण होईल असा विश्वास श्रीपुजार यांनी व्यक्त केला.



या बैठकीला सर्व तहसिलदार,गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## लंडनमधील हाऊस ऑफ कॉमन्स येथे एयू जयपूर मॅरेथॉन २०२६ चे भव्य पोस्टर लाँच

मुंबई: संस्कृती युवा संस्थेने यूके संसदेच्या 'हाऊस ऑफ कॉमन्स' येथे आयोजित भारत गौरव पुरस्कारांच्या निमित्ताने १७ व्या 'एयू जयपूर मॅरेथॉन २०२६' चे भव्य पोस्टर लाँच करण्यात आले. हा कार्यक्रम भारतीय संस्कृतीची जागतिक ओळख मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल होता, ज्याचे आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींनी आणि तेथे उपस्थित असलेल्या भारतीय समुदायाने खूप कौतुक केले. एयू स्मॉल फायनान्स बँकेच्या सहकार्याने वर्ल्ड ट्रेड पार्क आणि संस्कृती युवा संस्थेने आयोजित केलेल्या एयू जयपूर मॅरेथॉनचे आतापर्यंत सोळा आवृत्त्या झाले आहेत.लंडनचे खासदार श्री नवेंदु मिश्रा, माजी युके खासदार श्री वीरेंद्र शर्मा, हाऊस ऑफ लॉर्ड्सचे सदस्य श्री रेमी रेंजर, हाऊस ऑफ लॉर्ड्सचे माजी मंत्री बॅरोनेस संदीप वर्मा, प्रयाग महाकुंभाचे सल्लागार श्री राकेश कुमार शुक्ला, लंडनचे माजी महापौर श्री सुनील चोप्रा, संस्कृती युवा संस्थेचे अध्यक्ष पं. सुरेश मिश्रा. या प्रसंगी, पं. संस्कृती युवा संस्थेचे अध्यक्ष सुरेश मिश्रा म्हणाले, एयू जयपूर मॅरेथॉन ही केवळ मॅरेथॉन नाही तर भारतीय संस्कृती, आरोग्य जागरूकता आणि जागतिक एकतेचे प्रतीक आहे. हा कार्यक्रम लोकांना शारीरिक, मानसिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या जोडतो. आम्हाला अभिमान आहे की त्याच्या १७ व्या आवृत्तीचे उद्घाटन जागतिक लोकशाहीच्या केंद्रस्थानी, लंडनमधील हाऊस ऑफ कॉमन्स येथून झाले, ज्याने त्याला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली.

## गॉरमेट फूड डिस्कव्हरीचा उत्सव

बंगळुरू – जुलै २०२५: भारतातील देशांतर्गत ई–वाणिज्य बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्टने फूड फेस्ट २०२५ च्या दुसऱ्या आवृत्तीचे यशस्वीरित्या आयोजन केले. हा भारताच्या विकसित होत असलेल्या खाद्य संस्कृतीचा एक अद्वितीय उत्सव आहे. या कार्यक्रमाचे आयोजन ८ आणि ९ जुलै रोजी बेंगळुरूमधील फ्लिपकार्ट कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आले होते. हा महोत्सव ५ जुलै ते १० जुलैदरम्यान क्युरेटेड सेलद्वारे ऑनलाइन विस्तारित करण्यात आला. त्यामुळे ग्राहकांना उत्कृष्ट ब्रँड्समधील गोरमेट फूड कलेक्शन, नवीन उत्पादने आणि मर्यादित काळासाठी ऑफर्सची सुविधा मिळाली. या कार्यक्रमाने देशभरातील प्रसिद्ध शेफ, सर्वोत्तम क्रिएटर्स, ख्यातनाम ब्रँड आणि खाद्यप्रेमींना एकत्र आणले. त्यामुळे भारतातील गोरमेट फूड डिस्कव्हरी आणि कॉमर्सचे भविष्य घडवण्याच्या फ्लिपकार्टच्या वचनबद्धतेची खात्री झाली.

## सोनी सबवर 'इत्ती सी खुशी'

सर्व वयोगटातील प्रेक्षकांना भावतील अशी हृदयस्पर्शी आणि संबद्ध कथानके सादर करणारी वाहिनी म्हणून सोनी सबची ख्याती आहे. या वाहिनीवर लवकरच एक नवीन कौटुंबिक नाट्य 'इत्ती सी खुशी' सादर होणार आहे आणि या मालिकेत प्रमुख भूमिका करणार आहे एक अत्यंत गुणी अभिनेत्री, सुमबुल तौकीर खान. पडद्यावरची प्रभावी उपस्थिती आणि अभिनयातील गहिरेपण हे सुम्बुलच्या अभिनयाचे ठळक विशेष आहेत. ती या मालिकेत अन्विता दिवेकर ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल. मुंबईच्या पार्श्वभूमीवरील 'इत्ती सी खुशी' ही मालिका अन्विता या २१ वर्षीय मुलीची गोष्ट आहे. सहा भावंडांमध्ये सर्वात मोठ्या असलेल्या अन्वितावर अचानक आपल्या कोसळणाऱ्या कुटुंबाला सावरण्याची जबाबदारी येऊन पडते. तिचे वडील दारूच्या व्यसनाशी झगडत आहेत आणि आई त्यांना सोडून गेली आहे. अशा वेळी अन्विताच आपल्या कुटुंबाला एकत्र बांधून ठेवते आहे. आपल्या भावंडांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तिने स्वतःचे शिक्षण आणि आशा–आकांक्षा बाजूला सारल्या आहेत. तिचा दैनंदिन अस्तित्वाचा संघर्ष, मूक बलिदान आणि तिच्यातील प्रेम आणि चिकाटी या मालिकेत बघायला मिळेल.

## राजेश सखी–विवानच्या नात्याची कसोटी घेणार

सोनी सबवरील 'वागले की दुनिया' ही मालिका एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या माध्यमातून दैनंदिन जीवनाकडे बघते. अलीकडच्या भागांमध्ये, वागले कुटुंब भावनिक संकटांचा सामना करताना दिसत आहे. साईदर्शन सोसायटीच्या पुनर्विकासापासून ते राधिका (भारती आचरेकर)ची स्मृती अचानक जाण्यापर्यंत! या सगळ्या गदारोळात राजेश (सुमित राघवन) सखी (चिन्मयी साळवी)ला विवान (नमित शाह)पासून दूर करण्याचा प्रयत्न करतो, पण उलट ते दोघे अधिकाधिक जवळ येत असल्याचे त्याच्या लक्षात येते, त्यामुळे कुटुंबातला तणाव आणखीन वाढला आहे.

## कलाकारांनी इमोजीच्या भाषेचा आनंद साजरा केला!

आपल्यापैकी अनेकांसाठी इमोजी भावना व्यक्त करण्याचे दुसरे माध्यम बनले आहे, जसे होकार देण्यासाठी थम्ब अपचे इमोजी, प्रेम व्यक्त करण्यासाठी हार्ट किंवा आनंदमय क्षण शेअर करण्यासाठी हसऱ्या चेहऱ्यांचे इमोजी. आजच्या धावपळीच्या डिजिटल युगामध्ये हे लहान आयकॉन्स जागतिक स्तरावर भावनिक भाषा बनले आहेत, ज्यामधून व्यक्तीच्या मनातील भावना व्यक्त होतात. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री सोनल पनवार (मलायका, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') इमोजींनी त्यांच्या संवाद साधण्याच्या व कनेक्ट होण्याच्या पद्धतींना कशाप्रकारे आकार दिला आहे, याबाबत सांगत आहेत.

## 'छोरियाँ चली गाँव'मध्ये वेगळ्या रूपात सहभागी

भारतीय संस्कृतीचं वैभव आणि भावनिक खोली यांचं प्रतिबिंब असणाऱ्या हटके नॉन–फिक्शन फॉरमॅट्स सादर करण्याच्या आपल्या परंपरेला पुढे नेत, झी टीव्ही एक अनोखा रिॲलिटी शो – 'छोरियाँ चली गाँव' सादर करण्यासाठी सज्ज आहे. हा शो 'इंडिया' आणि 'भारत' यांच्यातील दरी कमी करतो, कारण यात ११ स्वतंत्र महिला एकत्र येणार आहेत, ज्या त्यांच्या शहरी जीवनातील धावपळ, वेगवान गती आणि आलिशान सुविधा मागे ठेवून ६० दिवसांपेक्षा अधिक काळ भारताच्या एका गावात राहणार आहेत. त्यांच्याकडे कोणतेही गॅजेट्स, सुविधा किंवा शॉर्टकट्स नसतील. त्या गावातील काम करतील, हळूहळू पण मुळापासून असलेल्या जीवनशैलीशी जुळवून घेतील आणि ग्रामीण जीवनशैलीत पूर्णपणे समरस होतील.

## हिट लिस्ट'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

एखादी व्यक्ती आपल्या प्रियजनांचे रक्षण करण्यासाठी कुठपर्यंत जाऊ शकते? जेव्हा न्याय वैयक्तिक सूडासारखा वाटायला लागतो, तेव्हा काय होतं? अशा प्रश्नांची उत्तरे देणारा एक थरारक भावनिक प्रवास घेऊन झी क्शन तुमच्यासमोर घेऊन येत आहे 'हिट लिस्ट'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर – मंगळवार, १५ जुलै रोजी संध्याकाळी ७:३० वाजता! दिग्दर्शक सूर्याकथीर आणि के. कार्तिकेयन यांच्या दिग्दर्शनाखालील हा चित्रपट केवळ गुन्हेगारी नाट्य नाही, तर अन्यायाशी थेट झुंज आहे. प्रत्येक क्षणाला रहस्ये उलगडत जातात आणि दडपलेल्या भावना उफाळून येतात. या चित्रपटात प्रेक्षकांना उत्कंठावर्धक कथा, थरारक रहस्य आणि भावनांनी भरलेला अभिनय पाहायला मिळणार आहे. आर. शरतकुमार यांनी एका कर्तव्यदक्ष पोलिसाच्या भूमिकेला सशक्ततेने साकारले आहे, तर विजय कनिष्क यांचे दमदार पदार्पण भविष्यातील एक उत्तम कलाकार उदयास येत असल्याची झलक देतो.

## अशोकराव आबाराव आहेर यांचे निधन



कन्नड :– दि.१४ जुलै – श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, प्रगतशील शेतकरी अशोकराव आहेर (आण्णा वय ७५ वर्षे यांचे दीर्घ आजाराने सोमवार रोजी सकाळी निधन झाले

त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी लव्हाळी टाकळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. डॉ. भीमराव आंबेडकर कानिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अभय आहेर व प्रगतशील शेतकरी विशाल आहेर यांचे ते वडील होत. स्व.अशोक आहेर हे दीर्घ काळापासून श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ येथे कार्यकारणीवर कार्यरत होते. ज्युनिअर कॉलेजचे अध्यक्ष, संस्था उपाध्यक्ष व आता संस्था सचिव अशा अनेक पदावर ते कार्यरत होते. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या जडण घडण व विकासात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

# सिल्लोड आजाराला पावला पांडुरंग तब्बल मिळाले १८ लाखाचे उत्पन्न

सिल्लोड प्रतिनिधी : सिल्लोड एसटी आगाराला यंदाच्या पंढरपूर यात्रेमुळे विठ्ठल पावला असून या पंढरपूर यात्रेतून आगारास विक्रमी १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. हे उत्पन्न आतापर्यंतच्या यात्रा उत्पन्नात सर्वाधिक असल्याचे आगारप्रमुख विजयकुमार काळवणे यांनी बोलताना सांगितले.

सिल्लोड आगाराच्या वतीने पंढरपूर यात्रेनिमित्त जय्यत तयारी करण्यात आली होती तालुक्यातील मागील त्या गावातील भाविकांसाठी गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात आली या योजनेचा ७ गावांनी लाभ घेतला होता. यामुळे १२ एसटी बसेस गाड्या ग्रामीण भागातून थेट पंढरपूरला सोडण्यात आल्या होत्या याशिवाय सिल्लोड बस स्थानकावरून पंढरपूर जाणाऱ्या यात्री करून साठी सोडण्यात आलेल्या ज्यादा बसेस मुळे आगाराला यंदा मागील अनेक वर्षांच्या तुलनेत चांगले उत्पन्न मिळाले.



**मागेल त्याला बस योजनेस पंढरपूर जाणाऱ्या भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला याशिवाय माझ्या सहकाऱ्यांनी बी मला चांगले सहकार्य केल्यामुळे आगाराचे उत्पन्न वाढविण्यात मला यश आले.**
**आगार प्रमुख विजयकुमार काळवणे सिल्लोड आगार.**

मागील वर्षी सिल्लोड आगाराच्या वतीने पंढरपूर यात्रेसाठी ८४ बस फेऱ्या झाल्या होत्या यातून ३४ हजार २७२ किलोमीटर होऊन ११ लाख ५४११ रुपयाचे उत्पन्न आगारास मिळाले होते. यावेळी ६७१९ प्रवाशांनी पंढरपूर यात्रेचा लाभ घेतला होता.

या वर्षी आगार प्रमुख काळवणे यांच्या योग्य नियोजनानुसार सिल्लोड आगाराकडून १२४ बस फेऱ्या झाल्या यात ४८ हजार २४४ किलोमीटर होऊन यातून १८ लाख ४८७९ रुपयाचे आगारास उत्पन्न मिळाले यासाठी १० हजार २८० प्रवाशांनी प्रवास केला.

सिल्लोड आगाराच्या वतीने पंढरपूर यात्रेसाठी च्या बस नियोजनासाठी मागील पंधरा दिवसांपासून आगारप्रमुख यांचे सोबत स्थानक प्रमुख विकास चव्हाण किरण अवसरमल वाहतूक निरीक्षक जे.यु. राऊत, अशोक काळे, कडुबा गावंडे, हरिओम शेळके आदि अधिकाऱ्यांसह गणेश मिसाळ व एसटी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कर्जबाजारी शेतकऱ्यांची विषारी औषध घेवून आत्महत्या



तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि.१४ जुलै

कर्जाचा डोंगर असलेल्या २८ वर्षीय कर्जबाजारी शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून जीवन संपविल्याची खळबळ जनक घटना शनिवारी रात्री अकरा वाजता सोयगाव तालुक्यातील बहुलखेडा येथे घडली

सुरेश अर्जुन पाटील (वय.२८) असे विषारी औषध घेऊन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.बहुलखेडा शिवारात त्यांची गट क्र–८० व गट–८२ शेती आहे.

कर्ज फेडण्याच्या विवंचनेत सुरेश पाटील या २८ वर्षीय शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन केले त्याच्यावर बँक आणि इतर खासगी असे एकूण सहा लाख इतके कर्ज आहे.उत्पन्नाचे हमी नसल्याने कर्जबाजारी शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन केले दरम्यान त्यास तातडीने उपचारासाठी जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असता,त्यास वैद्यकीय सूत्रांनी मृत घोषित केले पाचोरा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात येऊन रविवारी सकाळी अकरा वाजता शोकाकुल वातावरणात बहुलखेडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे बहुलखेडा गावात हळहळ व्यक्त होत आहे. त्याच्या पश्चात आई,वडील,पत्नी,दोन भाऊ,दोन मुले असा परिवार आहे.

# कैं सौ चंद्रकला माध्यमिक विद्यालय खांडी पिंपळगावच्या वतीने भेंडाळा मारोती डोंगर वृक्ष लागवड

खुलताबाद प्रतिनिधी–कै. सौ. चंद्रकला माध्यमिक विद्यालय, खांडी–पिंपळगाव आणि इको बटालियन यांच्या संयुक्त विद्यमाने, निसर्ग संवर्धनाचा हरित सोहळा भेंडाळा मारुती डोंगर परिसरात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली.



आपल्या निसर्गाचा समृद्ध वारसा जपण्यासाठी, परिसराला हिरवळ बहाल करण्याच्या उदात्त हेतूने तब्बल ५,९०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात कमांड अधिकारी कर्नल निर्देश शहा तसेच प्रोजेक्टर ऑफिसर प्रमोद सुभेदार मेजर चंद्रमान सिंग यांच्या नेतृत्वामध्ये व श्री तोडमल मारुती इको बटालियन ऑफिसर व तसेच कर्मचारी तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रमपूर्वक सहभाग घेतला. या प्रेरणादायी कार्यासाठी संस्थेचे अध्यक्ष महेश भाऊराव उबाळे पाटील आणि इको बटालियनचे सर्व अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे व सहभागी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

ही वृक्ष लागवड मोहीम निसर्गप्रेम, सामाजिक जबाबदारी आणि भविष्यासाठी हिरवे स्वप्न रुजवण्याचे अत्यंत सुंदर उदाहरण ठरली आहे.

**एक वृक्ष, हजारो श्वासांचे जीवन!**

यावेळी कै सौ चंद्रकला माध्यमिक विद्यालय खांडी पिंपळगाव चे मुख्यध्यापक संजय साळुंके, वैशाली मते, माणिक सपकाळ, दादासाहेब खंडागळे, चरणसिंग राठोड, सुशीलकुमार वडोदे,रंजन कच्छावासर, रितेश ठाकुर,, बाबासाहेब श्रीखंडे आदी उपस्थित होते

# वन्य प्राण्यांच्या त्रासाला कंटाळून महिलांचे अजिंठा वन विभागाला निवेदन!

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, १४ जुलै – वनविभागाच्या हद्दीतील ग्रामिण क्षेत्रात शेतकऱ्यांच्या पिकांची प्रचंड हानी झालेली आहे. शेतकऱ्यांचे अपार कष्ट मातीमोल होत असून पिकांच्या नुकसानीमुळे पुन्हा शेतकरी वर्ग समस्यांच्या विळख्यात सापडलेला आहे.केवळ आणि केवळ पावसाच्या भरवशावर उभा राहण्याचा प्रयत्न शेतकरी वर्ग करतो. मागील वर्षी सोयाबीन पिकांचे पावसाअभावी मोठे नुकसान झाले. कर्ज काढले, तेही पुरते फेडले गेले नाही. यावर्षी पुन्हा कर्ज काढून पीक जोमाने उभे केले. मात्र वन्यप्राण्यांनी उभे पीक उद्ध्वस्त करणे सुरू केले आहे.मागील दोन महिन्यांपासून शेतकरी सुखाने झोपलेला नाही.



हरिण, रोहीटे, रानडुकर आदी वन्य प्राणी प्रचंड हैदोस घालत असल्याची तक्रार अनेक वेळा करून देखील वनविभाग बंदोबस्त करत नसल्याने शुक्रवारी दि .११ जुलै रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने वनविभागला निवेदन देण्यात आले या निवेदनामध्ये उंडणगांव सारोळा. जळकी, वसई,हळदा,डकला, आमसरी, नाटवी, या गावातील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांपासून खूप त्रास आहे या शेतकऱ्यांचे अक्षरशः जीवन जगणे मुश्किल झालेले आहे म्हणून या त्रासाला कंटाळून उंडणगाव येथील शेतकरी महिला भगिनी स्वतः अजिंठा येथे येऊन वनविभागाला निवेदन दिले. निवेदनाच्या मुख्य मागण्या १)ज्या गावांना वनसंकटक्षेत्र आहे आशा प्रत्येक गावाला विशेष योजना राबून प्रत्येक शेतकऱ्याला तार कपाऊंड द्यावे . २)पूर्ण वनक्षेत्राला वन विभाने तार कुपाऊंड करून घ्यावे जेणेकरून वन्यप्रानी शेकऱ्यांना त्रास देणार नाही . ३)आतापर्यंत ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे आशा शेतकऱ्यांना आठ दिवसाच्या आत नुकसान भरपाई देण्यात यावी .आदी मागण्याचे निवेदन देण्यात आले या वेळी उपस्थित स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते युवा जिल्हाध्यक्ष पुरण सनाणसे,सुनिल पाटील शिंदे,अंबादास सुरडकर,साधना भागवत, हिराबाई सनाणसे, निरमलाबाई सनणसे, अंजु सनान्से सुनीता धनवाई,रुपाली सनणसे कल्पना सनान्से शशिकला पाटील निर्मला सनान्से, मीनाबाई सनान्से, हरणाबाई सनान्से, लीलाबाई पाटील प्रमोद भागवत तबडे आदींच्या स्वाक्षर्या निवेदनावर आहेत.


# जीवन जगण्यासाठी आहे, आत्महत्येसाठी नाही– ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

परतूर– कितीही अडीअडचणी, नैराश्य आले तरीही आत्महत्या हा कोणत्याही समस्येवरचा पर्याय होऊ शकत नाही. जीवन जगण्यासाठी आहे, आत्महत्येसाठी नाही. अध्यात्मीक दृष्ट्या आत्महत्या हे महतपाप असल्याने, आत्महत्येचा मार्ग पत्करु नये, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.



परतूर तालुक्यातील पळसखेडा येथे डॉ. फड यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जामुळे असो की अन्य कोणत्याही कारणास्तव असोत पण आत्महत्या हा भित्रा व पापाचरणाचा मार्ग असल्याचे साधार विवेचन त्यांनी केले. आई वडिलांचे खरे हित त्यांची मुलं चांगली निर्माण होण्यात असते असे सांगितले. मुलं ही केवळ मोठ्या महाविद्यालयात गेल्याने किंवा चार–दोन खासगी शिकवण्या लावल्याने चांगली निर्माण होत नाहीत, तर त्यांचेवर घरात होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. त्यामुळे आईवडीलांनी त्यांच्या आईवडीलांशी, बहिण भावंडांशी, शेजाऱ्या पाजाऱ्यांशी चांगले वागले पाहिजे. पालकांनी 'आधी केले मग सांगीतले' असे वागले पाहिजे. फड यांनी समाजातील काही अनिष्ट प्रथावर विविध अभंग, श्लोक, ओव्यांच्या आधारे घाव घातला. पुढे बोलतांना ते म्हणाले की, कर्तव्य हाच भक्तीचा व मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. म्हणून श्रीमद्भगवत गीता, श्री ज्ञानेश्वरी, गाथा आदी साहित्यातून कर्तव्यावरच भर देण्यात आला आहे. वाट्याला आलेले कर्तव्य सोडून कोणी कितीही भक्ती केली किंवा अन्य काहीही केले तरी खऱ्या अर्थाने त्याच्या पदरी काही पडत नाही. शेवटी रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे, याची जाण ठेवून वागले तर चुकीचे काही घडत नाही तसेच माणूस नको त्या बाबीत अडकत नाही. अर्थात, माणूस आपल्या कर्तव्य व जबाबदारीत आनंदी राहतो, असेही ते म्हणाले. या किर्तनाला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. उपसिथत सर्व भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

## हत्या प्रकरणातील आरोपींना पोलिस कोठडी!



तभा वृत्तसेवा

कन्नड :– दि.१४ जुलै – तालुक्यातील सिरजगाव येथील अमानुष हत्या प्रकरणातील आरोपींना कन्नड दिवाणी न्यायालया समोर हजर केले असता आरोपींना आठ दिवसांची पोलिस कोठडी सूनवण्यात आली आहे

सोमवार रोजी आरोपी आनंद राजपूत,समीर समद कुरेशी, इरफान शकील शहा,यांना पोलिसांनी कन्नड दिवाणी व फौजदारी कनिष्ठ स्तर न्यायालयासमोर हजर केले असता सरकारी वकिलांनी गुन्ह्याच्या तपासात पोलिसांना गुन्ह्यात वापरले हत्यार, दुचाकी, तसेच पोशाख, या गुन्ह्यात आणखी साथीदार आहेत का याचा तपास करणेसाठी आरोपींना पोलिस कोठडी द्यावी अशी मागणी केली होती, न्यायाधिश व्ही.डी. पाटील यांनी या गुन्ह्यातील तिन्ही आरोपींना आठ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे, सरकारी वकिल सतिश बडगुजर यांनी काम पाहिले तर आरोपींकडून वकिल स्वप्नील उपासनी, वकिल एच.जि. शेख, वकिल टी. डी. शिंदे यांनी काम पाहिले.

## प्रगत जीवन रक्षण तंत्रज्ञान- ईसीएमओ (ECMO) ने गंभीर रुग्णांच्या जीव वाचवले



छत्रपती संभाजीनगर – कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि नर्सिंग कॉलेज यांना अत्याधुनिक जीवन रक्षण तंत्रज्ञान ईसीएमओ (एक्स्ट्राकोर्पोरियल मॅब्रेन ऑक्सिजनेशन) – यशस्वीपणे राबवून सतत वापरत असल्याची घोषणा करताना अभिमान वाटतो आहे. हे तंत्रज्ञान गंभीर हृदय व/किंवा फुफ्फुस निकामी झालेल्या रुग्णांसाठी जीवनदायी ठरते.

ईसीएमओ ही एक अशी प्रक्रिया आहे जी रुग्णाच्या शरीराबाहेर रक्त ऑक्सिजनेट करते, जेव्हा हृदय किंवा फुफ्फुस हे योग्य प्रकारे कार्य करत नसतात. पाला अनेकदा हृदय–फुफ्फुस बायपास असेही म्हणतात. ती गंभीर निमोनिया, एआरडीएस (तीव्र श्वसन संकटकालीन सिंड्रोम), कार्डिओजेनिक शॉक किंवा हृदयविकाराच्या झटक्याच्या वेळी वापरली जाते. पारंपरिक व्हेंटिलेटर पुरेसा नसेल तेव्हा ईसीएमओ एक महत्त्वाचा पर्याय ठरतो. ईसीएमओच्या महत्त्वाविषयी बोलताना, रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज फर्नांडिस म्हणालेः ईसीएमओ गंभीर रुग्णांसाठी एक जीवनदायी संधी निर्माण करते, ज्यामुळे त्यांच्या हृदयाला किवा फुफ्फुसांना पुन प्रप्राप्तीची संधी मिळते प्रशिक्षित विशेषज्ञ व अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने आम्ही अनेक रुग्णांचे प्राण वाचवले आहेत. ईसीएमओविषयी जनजागृती वाढत असताना, कमलनयन बजाज रुग्णालय गंभीर प्रकरणांमध्ये वेळेवर वैद्यकीय प्रवेश व लवकर रेफरलसाठी प्रोत्साहन देत आहे. रुग्णालय आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान व उपचारपद्धतींचा वापर करून प्रगत आणि जीव वाचवणारी सेवा देण्याचे आपले ध्येय सातत्याने पूर्ण करत आहे.

## सेवानिवृत्त सुभेदार सुरेश वरकड यांचा सपत्नीक सत्कार



खुलताबाद तालुक्यातील पावसाळा गावातील शेतकरी कुटुंबातील देशाची सेवा करू भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्यानंतर आपल्या गावी परतलेल्या सुरेश नानाराव वरकड यांचा खुलताबाद तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे च्या वतीने भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, खुलताबाद पोलीस स्टेशनच्या वतीने शेख जाकीर भाई यांनीही भेट घेऊन सत्कार केला. अमोल गवळी, काशिनाथ तुपे, शंकर अंभोरे, तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चितेगावमधील सुरु असलेल्या ऑनलाइन जुगार अड्ड्यावर अखेर बिडकीन पोलिसांची कारवाई



बिडकीन : तभा वृत्तसेवा बिडकीन दि १४ जुलै पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील अनेक गावामध्ये जुगार अड्डे सुरू असून आज चितेगाव येथे ऑनलाइन चक्री जुगार अड्डा हा मागील सहा महिन्यापासून सुरू होता अनेकांच्या तक्रारी व चर्चेने शेवटी चितेगाव येथील तीन ठिकाणी बिडकीन पोलीसांनी कारवाई केली यामध्ये सरफराज गणी शेख वय ३५ वर्ष रा चितेगाव ता पैठण,व शाहरुख लाला शेख वय २५ वर्ष रा चांदणी चौक चितेगाव ता पैठण, तसेच सलमान नजीर शेख वय ३२ वर्ष रा श्रीनाथ नगर चितेगाव,या तिन्ही आरोपी कडून ऑनलाइन चक्री जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य व रोख रक्कम असे एकूण ८१७७० रुपयांचा मुद्देमाल पंचनामा करून ताब्यात घेण्यात आला आहे पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर, आप्पासाहेब माळी पुढील तपास करीत आहे.

## २१ नोव्हेंबरला उलगडणार 'असंभव'चा थरार

छत्रपती संभाजीनगर : मराठी चित्रपटसृष्टीत सस्पेंस, मिस्ट्री या जॉनरची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत असून असाच एक रहस्यांनी भरलेला 'असंभव' हा चित्रपट येत्या २१ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये दिसणारी थरारक दृश्यं, गूढ वातावरण यामुळे हा चित्रपट रहस्यपट असल्याचा अंदाज येतोय. मात्र या सगळ्यामागे नक्की काय रहस्य दडले आहे, याचा उलगडा येत्या २१ नोव्हेंबरलाच होणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शन सचित पाटील आणि पुष्कर सुधाकर श्रोत्री यांनी केलं आहे. मराठीतील नामंवत कलाकार सचित पाटील, मुक्ता बर्वे,प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आले असून त्यांच्या अभिनयाची जुगलबंदी अनुभवण्याची संधी या चित्रपटात प्रेक्षकांना मिळणार आहे. या चित्रपटाचं चित्रीकरण नैनीतालच्या गोठवणाऱ्या थंडीमध्ये करण्यात आलं असून नैनितालमध्ये चित्रीत झालेला हा पहिला मराठी चित्रपट आहे.

## अग्रलेख...

# छांगुर बाबाचा पाश

ज्या धर्माला हजारो वर्षांचा समृद्ध इतिहास राहिलेला आहे, ज्या धर्माने संकटावर संकटे सोसली, झेलली आणि सहन केली, त्या हिंदू धर्मावरील आक्रमणे अजूनही संपलेली नाहीत. भला मोठा डोंगर उंदरांनी पोखरून काढावा आणि कालांतराने तो धराशायी व्हावा, अशी स्थिती सध्या हिंदू धर्माची झाली आहे, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागत आहे. असेच चालत राहिले तर तो दिवस दूर नाही जेव्हा हिंदूंची स्थिती इराणमधील पारशांसारखी होईल किंवा स्वतःचे अस्तित्व गमावलेले असेल. ज्या धर्माच्या आधारावर १९४७ मध्ये देशाची फाळणी झाली, पुन्हा देश त्याच दिशेने हळूहळू जात असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. सर्वच बाजूंनी हिंदू धर्माचे लचके तोडण्याचे प्रकार देशात सुरू आहेत. एका बाजूने ख्रिश्चन मिशनरीज कधी गोड बोलून तर कधी पैशाचे आमिष देत हिंदूंमधील गरीब, निर्धन कुटुंबीयांना धर्मांतरित करीत आहेत, तर दुसऱ्या बाजूने छांगुर बाबासारखे कडवे, धर्मांध मुस्लिम पद्धतशीरपणे केवळ हिंदू मुलींचे जबरदस्तीने धर्मांतर करीत आहेत. उत्तर प्रदेशातील बलरामपूर जिल्ह्यातील जलालुद्दीन नावाचा माणूस जो पाच-सात वर्षांपूर्वी रस्त्यावर भीक मागायचा, पाच ते दहा रुपयात अंगठ्या विकून पोट भरायचा, आज त्याच्याकडे कोट्यवधींची संपत्ती जमा झाली आहे. मधपूर गावचा रहिवासी असलेल्या जलालुद्दीनने हाजी पीर जलालुद्दीन बाबा हे नाव धारण करून आपल्या भागातील गरीब, मजूर, असहाय, विकलांग आणि घटस्फोटितांना हेरत असे आणि त्यांना आपल्या जाळ्यात ओढत असे. मुंबईतील एका सधन सिंधी कुटुंबाला छांगुरने आपल्या जाळ्यात ओढले आणि इस्लाममध्ये आणले.

नवीन रोहरा, त्याची पत्नी नीतू व मुलगी समाले यांचे धर्मपरिवर्तन केले. एवढेच नव्हे तर नीचपणाचा कळस गाठणाऱ्या या ढोंग्याने नीतूला नसरीन नाव दिले. मुलीच्या वयाची असणाऱ्या या महिलेसोबत पत्नीसारखे वागायचा. अगदी २०२० पर्यंत छांगुर हा सर्वसाधारण होता. तो सातत्याने मुंबईतील हाजी अली दर्गा येथे भेट देत असे. येथेच त्याच्या जाळ्यात सिंधी कुटुंब अडकले आणि त्याचे नशीब फळफळले. पाच वर्षांतच त्याने असे कोणते कष्ट केले की त्याच्याकडे कोट्यवधींची माया जमा झाली? मधपूर येथे त्याने ७० खोल्यांचा आलिशान महालही उभारला. यातील ४० खोल्या अतिक्रमण करून सरकारी जमिनीवर बांधल्या. या खोल्या आता जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे हे घर नीतू ऊर्फ नसरीनच्या नावावर आहे. हिंदू धर्माला स्वकीयांनीच जास्त पोखरल्याची उदाहरणे इतिहासात आहेत. नीतू ऊर्फ नसरीनही त्याला अपवाद नाही. फक्त सातवा वर्ग शिकलेली नसरीन हीच हिंदू मुलींना जाळ्यात ओढत असे. कामाच्या अथवा आर्थिक मदतीच्या नावावर नीतू मुलींना बंगल्यात नेत असे. ज्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला त्यांची ओळख छांगुरशी करून दिली जाई. ज्या मुलींनी नकार दिला त्यांना धमकावत अथवा पोलिस ठाणे आणि खोट्या खटल्यात अडकवून इस्लाम स्वीकारण्यास कबूल करण्यास भाग पाडले जाई. नीतूचा पती नवीननेही जमालुद्दीन हे नाव धारण करून व्याजाच्या व्यवसायात लागला. खरे तर व्यवसाय हा नावापुरताच होता. धर्मांतराच्या या कटात जमालुद्दीनही सहभागी होता. अशा धर्मांधांना ना नीतीची चाड असते ना शरम. अटक होण्यापूर्वी छांगुर आणि नसरीन हे लखनौ येथील हॉटेलमध्ये एकत्र राहत होते. नीतू ही पती नवीनसोबत २०१५ मध्ये दुबईला गेली होती. परत आल्यानंतर २०१६ मध्ये दोघेही मुसलमान झाले आणि छांगुरच्या टोळीचे सदस्य झाले. २०२१ मध्ये नीतूच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला. नीतू छांगुरच्या मोहपाशात एवढी अडकली की तिने छांगुर हा माझा गुरू असल्याचे प्रतिज्ञापत्र उतरौला तहसील कार्यालयात सादर केले. २०१४ ते २०१९ या काळात नीतू आणि नवीन १९ वेळा आखाती देशात जाऊन आल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. खरे तर दुबईतील अरब मुस्लिम हे धर्मांतरात सहभागी नसतात. जे बाटगे हिंदुस्थानातून दुबईत राहायला गेले आहेत ते धर्मांतराचे रॅकेट चालवीत असतात. नीतू, नवीन आणि तिची मुलगी समाले यांनी भारतात नव्हे तर दुबईतील अल फारूख उमर बीन खताब सेंटरमध्ये इस्लाम धर्म स्वीकारला आहे आणि दुबई सरकारच्या धार्मिकविषयक विभागाने त्यांना धर्मांतर केल्याचे प्रमाणपत्रही दिले आहे. यावरून धर्मांतराचे काळे कृत्य आंतरराष्ट्रीय पातळीवरून सुरू असल्याचे उघड झाले आहे.

या देशाचे आणि हिंदूचे दुर्दैव म्हणजे छांगुर आणि त्याच्या टोळीने हिंदू मुलींचा बाजार मांडला होता. धर्मांतरासाठी जातीनुसार दर ठरले होते. ब्राह्मण, क्षत्रिय आणि शीख धर्मातील मुलींचे धर्मांतर केल्यास १५ लाख, मागास वर्गातील मुलींसाठी १२, तर अतिमागास जातीतील मुलींसाठी ८ ते १० लाख रुपये दिले जात असत. छांगुर आणि टोळीचा हा धंदा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होता. त्याने एकट्या बलरामपूर परिसरात ४० मुलींचे धर्मांतर केले. देशभरातील आकडा हा दीड हजारांपेक्षा जास्त असल्याचे उत्तर प्रदेश पोलिसांनी सांगितले आहे. याहीपेक्षा मोठे दुर्दैव म्हणजे एवढी वर्षे स्थानिक राजकीय पदाधिकारी, पोलिस आणि सामान्य नागरिक छांगुरकडे दुर्लक्ष करीत होते. हिंदू जर एवढे षंढासारखे वागले आणि हातावर हात धरून बसले तर हा सनातन धर्म रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाही. हिंदू आपल्या धर्माविषयी उदासीन आणि निष्क्रिय राहिल्यास छांगुर बाबासारखे आणखी धर्मांध निर्माण होणार आहेत. छांगुर नुसता धर्मांतरच करायचा नाही तर धर्मांतराचे जाळे देशभरात निर्माण करण्यासाठी संपत्तीही खरेदी करीत असे. जसजसी चौकशी पुढे जात आहे तसतसे नवीन खुलासे होत आहेत. छांगुरने लोणावळ्यात १६ कोटींची संपत्ती विकत घेतली आहे. नेपाळातील बँकांमध्ये खाती उघडून त्यात मुस्लिम देशांमधून कोट्यवधी रुपये आले आहेत. नसरीन आणि तिचा पती जलालुद्दीन यांची ४० पेक्षा जास्त बँक खाती आढळली आहेत.

विश्व हिंदू परिषदेचे नेते गोपाल राय यांनी हे प्रकरण उचलले नसते तर छांगुरने कितीतरी हिंदू मुलींना नरकासमान जीवनात ढकलले असते. असे छांगुर बाबा केवळ उत्तर प्रदेशातच नाहीत तर देशभरात पसरले आहेत. देवभूमी उत्तराखंडमध्ये जमीन जिहादच्या नावावर हिंदूंना लक्ष्य केले गेले. अशा बाबांना रोखण्याची आणि कारागृहात डांबण्याची जबाबदारी समस्त हिंदूंची आहे. आज केंद्रात सनातन धर्माविषयी प्रेम आणि कळवळा असणारे सरकार गेल्या ११ वर्षांपासून असल्याने कुठेतही बहुसंख्यकांमध्ये सुरक्षिततेची भावना आहे. सरकार आपल्या परीने कार्य करीत असताना हिंदू धर्मात ज्यांनी सवतेसुभे तयार केले आहेत, त्यांनी आता सनातन रक्षणाची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. नुसते १२ वर्षांतून एकदा येणाऱ्या कुंभमेळ्यात शक्तिप्रदर्शन करणे आणि त्यानंतर गुमनाम होणे देशाला आणि धर्माला परवडणारे नाही. देशाच्या चार कोपऱ्यांत चार शंकराचार्य हातात धर्मदंड घेऊन नुसतेच बसले आहेत. हिंदू धर्म आणि सनातन संस्कृतीचे संवर्धनात त्यांचे काहीच योगदान सामान्यांना दिसत नाही. एकीकडे इतर धर्मांचे धर्मगुरू आपापल्या धर्माचा प्रसार आणि प्रचारासाठी कार्यरत असताना आपले शंकराचार्य मात्र मठात निद्रावस्थेत आहेत. नुसत्या होमहवनांनी आणि प्रार्थना केल्याने सनातन वाचणार नाही तर गल्लीबोळात जाऊन नागरिकांना विश्वास देणे आवश्यक आहे. स्वतःला धर्मगुरू, पीठाधीश मानणारे कर्मकांडात गुंतून राहिल्यानेच समाजात छांगुर बाबा तयार होत आहेत. हिंदूंच्या मुलींची धर्मांतरासाठी बोली लावली जात असतानाही जर हे पीठाधीश चवताळून उठत नसतील तर तुमच्या असण्याला काहीच अर्थ उरत नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी


# भारतमुक्त नवा 'सार्क'!

'नशा' कशी असते याची एक गोष्ट सांगितली जाते. एकदा एका व्यक्तीने एका मडक्यात हात घातला. तेथे दडून बसलेल्या सापाने त्या व्यक्तीला दंश केला. त्या व्यक्तीने हे दोन-तीन वेळा केले. प्रत्येक वेळी सापाने त्या व्यक्तीला दंश केला. मग त्याला सापाच्या विषाची नशा चढू लागली. ती त्याला आवडू लागली आणि मग ती व्यक्ती दररोज त्या मडक्यात हात घालू लागली. त्यात साप आहे हे माहीत असूनही ती हे करू लागली. हा परिणाम होता त्या व्यक्तीला जडलेल्या सापाच्या विषाच्या नशेचा! त्या नशेसाठी ती व्यक्ती वारंवार मडक्यात हात घालू लागली.

**अमेरिकेची नशा :** अमेरिकेलाही पाकिस्तानसोबत मैत्री करण्याची अशीच नशा जडली आहे. पाकिस्तान कसा आहे- काय आहे हे अमेरिकेला चांगले ठावूक आहे. पण, पाकिस्तानसोबत मैत्री करण्याची नशा जणू अमेरिकेला जडली आहे. अमेरिका पुन्हा पुन्हा पाकिस्तान नावाच्या फुटक्या मडक्यात हात घालून त्या नशेचा आनंद घेत आहे .

**'क्वाड'ची बैठक :** अमेरिका, जपान, भारत, ऑस्ट्रेलिया या चार देशांच्या संघटनेची नुकतीच वॉशिंग्टनमध्ये बैठक झाली. त्यात दहशतवादाच्या विरोधात प्रस्ताव पारित झाला. पहलगामचा उल्लेख करण्यात आला. पण, पाकिस्तानचा उल्लेख करून त्याचा निषेध करण्यास अमेरिकेने नकार दिला.

अमेरिकेच्या इतिहासात या देशावर सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला करणाऱ्या ओसामा बिन लादेनला पाकिस्तानने आश्रय दिला होता हे माहीत असूनही अमेरिका पाकिस्तानचा निषेध करण्याचे टाळीत आहे. उलट भारत-पाकिस्तान दोघांनाही एकाच पारड्यात टाकून त्यांना समान लेखण्याचे अमेरिकेचे नवे धोरण असल्याचे दिसते. याच अमेरिकेच्या एका राष्ट्रपतींनी- जॉर्ज बुश यांनी, पाकिस्तानने दहशतवादाच्या विरोधात अमेरिकेला सहकार्य न केल्यास त्या देशास 'पाषाणयुगात' पोहोचविण्याची भाषा उच्चारली होती. 'एक तर तुम्ही आमच्या बाजूने आहात वा मग दहशतवादाच्या बाजूने' असा सज्जड दम बुश यांनी दिल्यानंतर पाकिस्तानचे लष्करी शासक जनरल मुर्शरफ यांनी नरमाईची भूमिका घेत, अमेरिकेला सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. विशेष म्हणजे बुश व ट्रम्प एकाच रिपब्लिकन पक्षाचे आहेत. आता पुन्हा अमेरिकेला पाकिस्तान हवा आहे. कारण, अमेरिकेला पाकिस्तानसोबत मैत्री करण्याची नशा जडली आहे, ही नशा या देशाला आवडू लागली आहे.



**भारतमुक्त 'सार्क' :** दरम्यान, चीनने भारताविरोधात एक नवा उद्योग सुरू केला आहे. १९८७ मध्ये भारताच्या पुढाकाराने 'सार्क' म्हणजे 'साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल को-ऑपरेशन' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. स्व. राजीव गांधी त्यावेळी देशाचे पंतप्रधान होते. अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका या आठ देशांनी एकत्र येत परस्पर सहकार्यासाठी सार्कची स्थापना केली होती. मागील काही वर्षांपासून सार्क पूर्णपणे निष्क्रिय आहे.

सार्कच्या घटनेनुसार एखादाही देश सार्क बैठकीला येणार नसेल तर सार्कची बैठक बोलविता येत नाही. भारताने पाकिस्तानसोबत चर्चा न करण्याचे धोरण राबविले आहे. त्यामुळे सार्कची बैठक आयोजिणे शक्य नव्हते. सार्क परिषद ठप्प झाली.

आता चीनची नजर सार्कवर गेली असून, सार्कला सक्रिय करण्यात चीन पुढाकार घेत आहे. अर्थात भारताला डावलून. सार्क देशांपैकी पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, श्रीलंका, नेपाळ, मालदीव हे सातही देश चीनच्या बाजूने गेले आहेत. त्यामुळे भारताला बाजूला करा आणि नवे सार्क स्थापन करा असा प्रयत्न चीनने सुरू केला आहे. अर्थात सार्कऐवजी दुसरे नाव ठेवले जाईल. याला अमेरिकेचाही पाठिंबा असल्याचे म्हटले जाते. दक्षिण आशियात स्थिरता निर्माण करणारा घटक म्हणून पाकिस्तानकडे पाहिले जात आहे. पाकिस्तान स्वतः याचा दावा करीत आहे. ज्या देशात कधी स्थिरता नांदली नाही, त्या देशाला दक्षिण आशियाचा नेता करण्याचे चीनचे स्वप्न आहे. यातील पाकिस्तान, मालदीव, बांगलादेश व अफगाणिस्तान हे चार देश मुस्लिम आहेत हे विशेष. चीनच्या आशीर्वादाने लवकरच हे होण्याची शक्यता आहे. नवा सार्क स्थापन करून भारताला शह देण्याचा प्रयत्न चीन यातून करणार आहे. चीनने हे करावे यात काहीच नवल नाही. भारताने लडाखचे कलम ३५ अ रद्द केल्यापासून चीन जणू बिथरला आहे. त्याचेच परिणाम सध्या दिसत आहेत.

**अमेरिकेचे दुर्दैव :** जार्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन, थॉमस जेफरसन यासारखे महान व दिग्गज राष्ट्रपती मिळालेल्या अमेरिकेचे दुर्दैव म्हणजे आज या देशाला डोनाल्ड ट्रम्प नावाचा राष्ट्रपती लाभला आहे. ट्रम्प हे स्वतः मोठे उद्योगपती आहेत. आज ते केवळ व्यापाराबाबत बोलत आहेत. चीन आपले हातपाय कसे पसरत आहे याची त्यांना जराही चिंता नाही. अन्यथा त्यांनी पाकिस्तानला चुचकारण्याचे धोरण स्वीकारले नसते. पाकिस्तानी जनरल आसिफ मुनीरसाठी व्हाईट हाऊसमध्ये लाल पायघड्या घातल्या नसत्या.

**नवा भस्मासुर :** चीन व अमेरिका दोघेही पाकिस्तानला साथ देत नवा भस्मासुर तयार करीत आहेत. एक दिवस हा भस्मासुर अमेरिकेसाठी डोकेदुखी ठरणार आहे.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपले एक मित्र एलन मस्क यांना जणू डोक्यावर घेतले होते. त्यांना सरकारमध्ये नियुक्त केले होते. मस्क यांची लहान मुले व्हाईट हाऊसच्या ओव्हल कार्यालयात धुडगूस घालीत आहेत आणि ट्रम्प त्यांच्याकडे कौतुकाने पाहात आहेत अशी छायाचित्रे जगभर प्रसिद्ध झाली. लवकरच ट्रम्प-मस्क यांच्यात वाद होणार हे स्पष्ट दिसत होते. आणि अपेक्षेपेक्षा ते लवकर झाले. आता राष्ट्रपती ट्रम्प, एलन मस्क यांना दक्षिण आफ्रिकेत, या त्यांच्या मायदेशी परत पाठविण्याची भाषा बोलू लागले आहेत.

पाकिस्तानबाबतही अमेरिकेचा पुन्हा भ्रमनिरास होणार आहे. पण, त्यापूर्वी अमेरिकेने व जगाने याची मोठी किंमत मोजलेली असेल. जागतिक राजकारणात अमेरिकेचे पहिल्या क्रमांकाचे स्थान चीनने घेतलेले असेल आणि चीनने पाकिस्तानला डोक्यावर बसविल्याने भारताची डोकेदुखी वाढलेली असेल.

**चीनला आवरण्यासाठी :** चीनला वेसण घालण्यासाठी भारतापेक्षा चांगला मित्र व सहकारी नाही याची कल्पना राष्ट्रपती ट्रम्प यांना असावयास हवी होती. भारत आणि अमेरिका यांची मूलभूत मूल्ये सारखी आहेत. लोकशाही, वृत्तपत्र स्वातंत्र्य, मानवाधिकारांचे संरक्षण व कायद्याचे राज्य या भक्कम मूल्यांवर दोन्ही देशांची अढळ निष्ठा आहे. आणि दुसरीकडे चीन-पाकिस्तान! दोन्ही देशांत हुकूमशाही, लष्कराचे शासन, मानवी अधिकारांचे उल्लंघन, हिंसेचा पुरस्कार.

जगात चीनचे प्रस्थ वाढत असताना, अमेरिकेने पाकिस्तानचेही प्रस्थ वाढविण्याचा प्रयत्न करावा? अमेरिका व ट्रम्प यांनी पाकिस्तानच्या नादी लागावे?

**मर्चंट ऑफ अमेरिका :** एका व्यापाऱ्याकडून यापेक्षा दुसरी कोणती अपेक्षा करता येईल? डोनाल्ड ट्रम्प हे राष्ट्रपती असले तरी ते अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत श्रीमंत राष्ट्रपती आहेत. काही दशकांपूर्वी एक इंग्रजी पुस्तक फार गाजले होते, 'मर्चंट ऑफ व्हेनिस'! डोनाल्ड ट्रम्प यांचा इतिहासात उल्लेख 'मर्चंट ऑफ अमेरिका' असाच केला जाईल.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# सरकारी नोकरीचा अट्टहास कशासाठी?

महाराष्ट्रात बेरोजगारीचा दर कमी होत आहे, ही समाधानाची बाब असली तरी बहुतांश तरुणाईचा कल सरकारी नोकऱ्यांकडे आहे. सध्या राज्यातील बेरोजगारीचा दर ३ टक्क्यांच्या आसपास स्थिरावला आहे. खाजगी क्षेत्रातही अनेक मानाची पदे व भरघोस पगाराच्या नोकऱ्या असतात. परंतु, तरीही बहुतांश उमेदवारांना सरकारी नोकरीच हवी असते. ही कोंडी फोडणे काळाची गरज आहे. पूर्वीच्या तुलनेत प्राध्यापक होण्यासाठी आता वेगवेगळे निकष पूर्ण करावे लागतात. राज्यातील १५ विद्यापीठांमध्ये एकूण २,५३४ प्राध्यापक पदे मंजूर असून १,३६८ पदे भरल्याचे एका अहवालात म्हटले आहे. राज्यात अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची ३७० आणि सहायक प्राध्यापकांची २,०८८ पदे रिक्त आहेत. सरासरी विचार केला तर प्राध्यापकांना दरमहा ९०,६२० रुपये पगार मिळतो. काहींना वर्षाला लाखो रुपये मिळतात. मात्र, यातील किती प्राध्यापक आपल्या कामाला न्याय देतात, हा खरा प्रश्न आहे. प्राध्यापकांनी आपले काम राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पार पाडले तर विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणी लावण्याची गरज उरणार नाही. अशाही परिस्थितीत काही कर्तव्यदक्ष प्राध्यापक आपल्या पदाला न्याय देतात. प्रसंगी ते विद्यार्थ्यांच्या हितासाठी झटतात आणि अशाच प्राध्यापकांच्या भरवशावर शिक्षण विभागाने कात टाकली आहे. दीड दशकापूर्वीपर्यंत डोनेशनच्या नावावर नोकऱ्या बहाल करण्यात आल्याने गुणवंतांना डावलून दुय्यम उमेदवारांना संधी देण्यात आली. परिणामी, राज्याची आणि पर्यायाने देशाची मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हानी झाली. (ही परिस्थिती आजही काही प्रमाणात असू शकेल?) केवळ शिक्षण क्षेत्रातील नोकरदारांना दोष देऊन चालणार नाही. बहुतांश क्षेत्रात अशीच स्थिती आहे आणि ही बाब नाकारणे खूपच धाडसाचे ठरेल!

कृषी क्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा संबंध थेट शेतकऱ्यांशी येतो. परंतु, या विभागातील अनेक अधिकारी-कर्मचारी केवळ खुर्चीवर बसून अहवाल तयार करतात. नुकसानग्रस्तांची यादी शेतशिवाराला भेट न देताच तयार करतात. त्यामुळे अनेकदा नुकसानग्रस्तांच्या जागी भलत्याच शेतकऱ्यांना मदतीची रक्कम दिली जाते. तलाठी जनतेचा नोकर असतो. परंतु, या लोकांची शेतकऱ्यांशी वागणूक मालकासारखी असते. सेवाज्येष्ठता ध्यानात घेतली तर तलाठ्यांना भरघोस पगार मिळतो. तरीही हे लोक चार-दोन हजारांत महिना काढणाऱ्या गोरगरीब शेतकऱ्यांकडून शे-पाचशे रुपयांची अपेक्षा करतात! हे चित्र बदलले पाहिजे. त्याशिवाय गावांच्या विकासाची आणि पर्यायाने देशाच्या विकासाची कल्पना करता येत नाही. महाराष्ट्रातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या निवडणुका शेष असल्याने ग्रामसेवकांच्या हातात दीर्घकाळापासून कारभार एकवटला आहे. परंतु, अनेक ठिकाणचे ग्रामसेवक महिनोमहिने गावात येतच नाही. आठवडी बाजाराच्या दिवशी दोन-तीन तास दिसतात आणि एक दोन फाईल्स पुढे सरकवून निघून जातात! ग्रामसेवकांनाही चांगला पगार मिळतो. सरकारी नोकरदारांना काम कमी असते, असेही नाही. काही विभागांत मनुष्यबळाअभावी कामाचा प्रचंड ताण असतो. जिल्हा परिषदांचे शिक्षक आणि पोलिस प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना नेहमी अधिक वेळ कामे करावी लागतात. जिल्हा परिषद क्षेत्रात भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी असले तरी पोलिस प्रशासनात आजही भ्रष्टाचार चालतो. परंतु, आता देशप्रेमी तरुणाईची संख्या पोलिस प्रशासनातही वाढू लागल्याने बऱ्याचअंशी वातावरण निवळू लागले आहे. पूर्वी या क्षेत्रात वशीला आणि पैशांची देवाण-घेवाण केल्याशिवाय नोकऱ्याच मिळत नव्हत्या. त्यामुळे रुजू झाल्यानंतर नोकरीसाठी लागलेला खर्च वसूल करण्याकडे कल असायचा.

आता पोलिस भरतीत पारदर्शकता आल्याने तळागाळातील उमेदवारांना संधी मिळत आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. २०११ च्या जनगणनेत महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी होती. ती आता १२.८३ कोटींवर गेली आहे. यात तरुणाईची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे ठरवूनही सर्वांना रोजगार देता येत नाही. त्यामुळेच राज्य सरकारने सुशिक्षित बेरोजगारांसाठी अनेक योजना आणल्या. यापैकी बीज भांडवल ही एक प्रमुख योजना होय. परंतु, तरुणाईला केवळ नोकरी हवी आहे आणि तीसुद्धा सरकारी! देशातील अनेक गुणवंत न्याय मिळत नसल्याने विदेशात जातात. हे उमेदवार गुणवत्ता असूनही विविध सबबींखाली संधी डावलली जात असल्याने विदेशात जातात, ही एक प्रकारची राष्ट्रीय हानीच आहे. त्यामुळे या विषयावर सरकार आणि सामाजिक स्तरावर विचारमंथन होणे गरजेचे आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# धर्मांतरण हे राष्ट्रांतरणच

जलालुद्दीन ऊर्फ छांगुर बाबा याला नुकतीच उत्तर प्रदेशमधील बलरामपूर जिल्ह्यातून अटक झाली. आता तपासात असे निष्पन्न झाले आहे की, मागील पंधरा वर्षांपासून हा जलालुद्दीन उत्तर प्रदेशमध्ये धर्मांतरणाचे योजनापूर्वक काम करीत होता. नेपाळमधील वेगवेगळ्या लोकांच्या नावावरील शंभर बँक खात्यांमधून याच्याकडे इस्लामी देशातून ५०० कोटींपेक्षा अधिक रक्कम पाठविण्यात आलेली आहे. यावरून हे स्पष्ट होते की धर्मांतरण करणारे हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहे. यांचा उद्देश आध्यात्मिक प्रगती हा नसून देशामध्ये लोकसंख्येचा असमतोल निर्माण करण्याचा आहे. यांचा उद्देश लोकांना अराष्ट्रीय बनविण्याचा आहे.

स्वामी विवेकानंद म्हणायचे की, ज्या वेळेस एक हिंदू परधर्मात जातो त्यावेळेस हिंदूंची संख्या केवळ एकने कमी होते असे नाही तर हिंदू धर्माचा एक शत्रू सुद्धा वाढतो. आपल्या देशामध्ये धर्मांतरणाचे कार्य करणारे इस्लाम आणि ख्रिश्चन हे दोन धर्म आहेत. या दोन्ही धर्मांना जगामध्ये आपला धर्म व्याप्त करणे हे ईश्वरी कार्य वाटते. त्यासाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असतात. मुसलमान कधीच ख्रिश्चन धर्मात जात नाही व ख्रिश्चन लोक सुद्धा फारच अपवादाने मुसलमान धर्मात प्रवेश करतात. एखाद्याने स्वखुशीने इस्लामचा किंवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करणे याबद्दल कोणीही त्यांच्याबद्दल फारसे बोलणार नाही. परंतु भारतामध्ये जे धर्मांतरण सुरू आहे यामध्ये लक्ष्य हिंदू धर्म आहे. हिंदू धर्मातील अनुसूचित जाती व जमातींना नेहमीच लक्ष्य केले जाते.

आमच्या धर्मामध्ये तुम्ही आल्यास तुम्हाला उच्च स्थान प्राप्त होईल असे या जमातींच्या लोकांना सांगण्यात येते. परंतु वस्तुस्थिती मात्र निराळीच आहे. हिंदू धर्मातील अनुसूचित जाती जमातीचे लोक ख्रिश्चन किंवा मुस्लिम धर्मात प्रवेश करतात त्यांना इतर उच्चवर्णीय मुस्लिम किंवा ख्रिश्चनांचा दर्जा मिळत नाही. भारतातून १९४७ साली पाकिस्तानात गेलेला समाज आजही त्यांना मुहाजीर म्हणजे शरणार्थी संबोधले जाते. पंजाबमध्ये सुद्धा ख्रिश्चन धर्मीयांचे धर्मांतरणाचे खूप काम सुरू आहे. एकट्या तरणतारण जिल्ह्यामध्ये ख्रिश्चन धर्मीयांची संख्या १०२ टक्क्यांपेक्षा अधिकने वाढलेली आहे. तिथे शीख धर्मामध्ये जे मागासवर्गीय शीख आहेत त्यांना ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतरित करण्याचे फार मोठे कारस्थान सुरू आहे. परंतु जे ख्रिश्चन भारतामध्ये धर्मांतरणाचे कार्य करीत आहेत त्यांच्या इंग्लंडमध्ये मात्र आग लागलेली आहे व तेथेच अल्पसंख्य होण्याची वेळ त्यांच्यावर येणार आहे. लंडन आणि बकिंगहॅम येथे त्यांच्यावर अल्पसंख्य होण्याची वेळ आलेली आहे. येणाऱ्या काळामध्ये ब्रिटनचा महापौर सुद्धा मुस्लिम होऊ शकतो अशी त्यांच्यावर परिस्थिती आहे. असे असताना सुद्धा या संकटाला न ओळखता ख्रिश्चन मात्र भारतामध्ये धर्मांतरणाचे आपले काम करीत आहे. पंजाबमधील जे लोक धर्मांतरित होत आहेत त्यांच्यावर पाकिस्तानची आयएसआय किंवा खलिस्तानवादी शीख फॉर जस्टिस अशा संघटनांचा डोळा असतो व याच लोकांना भारतविरोधी कारवायांसाठी निवडले जाते. जलालुद्दीन ऊर्फ छांगुर बाबा जे कार्य करीत होता ते कार्य करण्यासाठी त्याला सौदी अरेबिया आणि इतर मुस्लिम राष्ट्रांतील धनाढ्य मुस्लिमांची मदत होती. भारतामध्ये लव्ह जिहाद काही नवीन नाही. भोळ्याभाबड्या अल्पवयीन मुलींना फसवून, त्यांच्यासोबत प्रेमाचे नाटक करून कधी आपली ओळख लपवून त्यांच्याशी लग्न करण्याचे प्रकार घडतात आणि त्यानंतर त्यांना इस्लाम धर्म स्वीकारावा लागतो. अशा पद्धतीने हिंदूंची संख्या मुस्लिम व ख्रिश्चन या दोघांच्याही धर्मांतरणवादी कारवायांमुळे कमी होत आहे. नुकताच जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आलेला आहे. यामध्ये वेगवेगळ्या धर्मांच्या लोकसंख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये हिंदूंचा जन्मदर हा स्थिर दाखवण्यात आलेला आहे. तर मुसलमानांच्या जन्मदरामध्ये वाढ झालेली आहे असे प्यु रिसर्च सेंटरतर्फे २७०० सर्वेक्षणांचा अभ्यास करून सांगण्यात आलेले आहे. हिंदूंचा जन्मदर हा आता खूप कमी होत चाललेला आहे म्हणजे तो ६.१८ वरून १.२९ इतका कमी झालेला आहे. सुशिक्षित जोडप्यांचे विचार मुलं होऊ देण्याबाबत सकारात्मक नाही. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये जगातील इतर देशांसारखा भारत हा सुद्धा वृद्धांचा देश होईल का असाही प्रश्न आहे. हिंदू अल्पसंख्य होतील का असाही प्रश्न आहे.

मागील जून महिन्यात सांगली येथील ऋतुजा नावाच्या विवाहित गरोदर महिलेने आत्महत्या केली. तिचे आत्महत्या करण्याचे कारण काय होते, तर ज्या परिवारामध्ये तिचा विवाह लावून देण्यात आला होता त्या लोकांनी आम्ही हिंदू धनगर आहोत असे सांगितले. परंतु लग्नानंतर ऋतुजाच्या लक्षात आले की हे लोक धर्मांतरित झालेले ख्रिश्चन आहेत. तिच्या सासरच्या लोकांनी तिच्या हिंदू धर्मातील देवी-देवतांच्या पूजेला विरोध केला व तिला जबरदस्तीने चर्चमध्ये जाणे, बायबल वाचणे इत्यादी गोष्टींची सक्ती केली. तिने हे आपल्या आई-वडिलांना सांगितले. शेवटी ज्यावेळेला तिच्यावरचा धर्मांतरणासाठीचा दबाव वाढत गेला त्यावेळेस सात महिन्यांची गरोदर असताना सुद्धा तिने आत्महत्या केली.

म्हणूनच आपण हे समजून घेतले पाहिजे की भारतात चालणारे धर्मांतरण हे आध्यात्मिक परिवर्तन नाही तर हे राष्ट्रांतरणाचे षडयंत्र आहे. लोकसंख्येचा असमतोल निर्माण करून या देशांमध्ये इस्लामी राजवट निर्माण करता येईल असे काही लोकांना वाटते. मणिपूर, नागालॅण्ड, मिझोरमसारख्या प्रदेशांमध्ये जिथे मोठ्या प्रमाणावर ख्रिश्चनीकरण झालेले आहे, तिथे त्यांच्या निष्ठा या भारत सरकारबद्दल कमी व भारताबाहेरच्या लोकांप्रति जास्त असतात. पंजाबमध्ये कार्य करणारी शीख फॉर जस्टिस ही खलिस्तानवादी संघटना मणिपूरच्या लोकांना सुद्धा भारत सरकारविरुद्ध भडकवण्याचे कार्य करीत असते. इस्लामी दहशतवाद तर आपल्याला माहीतच आहे. याच दहशतवादामुळे व लोकसंख्येच्या असमतोलामुळे भारताचे विभाजन झाले व पाकिस्तानचा जन्म झाला. ९० च्या दशकामध्ये काश्मीरमधून याच लोकसंख्येच्या असमतोलामुळे व जिहादी प्रवृत्तींमुळे तेथील तीन लाख काश्मिरी हिंदूंना भारताच्या इतर प्रांतांमध्ये आश्रय घ्यावा लागला होता. गैरहिंदू लोकांची संख्या वाढल्यामुळे भारताच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे. त्याचबरोबर भारताची धार्मिक, सांस्कृतिक, ओळख सुद्धा समाप्त होऊ शकते. एकीकडे हिंदू संतती नियमन करतो आहे आणि दुसरीकडे धर्मांतरणाच्या माध्यमातून हिंदू परधर्मात चाललेले आहेत. याचा परिणाम एकगठ्ठा मतदानावर सुद्धा होतो व अहिंदू लोक आपल्या पसंतीचे राष्ट्रीय विचारांच्या विरोधात जाणारे सरकार सुद्धा निवडून आणू शकतात. अहिंदू लोकांची संख्या वाढणे म्हणजे भारतामध्ये कोण पंतप्रधान होणार हे सुद्धा भविष्यात हे लोक ठरवू शकतील. हा देश बायबलच्या नियमानुसार चालणार की शरीयतनुसार चालणार हे सुद्धा हे लोक ठरवतील. हा भारतातल्या शांतताप्रिय परंतु बेसावध व झोपाळू हिंदू समाजासाठी मोठा धोक्याचा इशारा आहे.

हिंदूंनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, धर्मांतरणाचे कार्य हे राजकीय आहे. त्यांना तुमची आध्यात्मिक प्रगती करायची नसून तुमचा देश हस्तगत करायचा आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आपण खाये वांगे, अन् चातुर्मास सांगे

मुंबईच्या वरळी येथे उबाठाचे उद्धव ठाकरे आणि मनसेचे राज ठाकरे यांनी 'विजयी' सभा आयोजित केली होती. या सभेला प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी जरा जास्तच प्रसिद्धी दिली असे वाटते. कारण या दोन्ही पक्षांची महाराष्ट्रात 'एक्सपायरी डेट' केव्हाचीच संपलेली आहे. पक्षाचे अस्तित्व टिकविण्याचा हा त्यांचा केविलवाणा प्रयत्न आहे. जनतेने सपशेल नाकारलेले हे दोन्ही नेते एका साध्या विषयाला विजय मानत आहे. विधानसभेत उद्धव यांच्या उबाठाचे २० आमदार, तर राजच्या मनसेला भोपळाही फोड़ता आला नाही. खुद्द राज ठाकरे आपल्या मुलाला मुंबईतून आमदार म्हणून निवडून आणू शकले नाही. यावरून या पक्षाची मुंबईत किती ताकद आहे ते कळते. यांची मुलं, नातवंडं इंग्रजी माध्यमांच्या शाळात शिकणार तरी हे आम्ही मराठीचे कसे रक्षणकर्ते आहोत ते सांगणार हा प्रकार म्हणजे 'आपण खाये वांगे, अन् चातुर्मास सांगे' असा आहे. मुंबई महापालिकेच्या येत्या निवडणुकीत सत्ता जाण्याचा, मुंबई म्हणजे हे आपली जहांगिरी समजतात काय? यांनी एकत्र येऊन मुंबईत ठिकठिकाणी कितीही राजकीय पथनाट्ये केली, कितीही भावनिक साद घातली तरीही हे सत्तेत येणे नाही.

**गजेंद्र डोळके**/नागपूर

● ● ● ●

### आरोग्यदायी चातुर्मास

चातुर्मास (चार मासांचा कालावधी) हा हिंदू धर्मात खूप पवित्र आणि महत्त्वाचा मानला जातो. हा काळ आषाढ शुद्ध एकादशी म्हणजे देवशयनी एकादशीपासून सुरू होतो आणि कार्तिक शुद्ध एकादशी म्हणजे प्रबोधिनी एकादशीपर्यंत चालतो. इंग्रजी महिन्यानुसार जुलै ते नोव्हेंबर सुमारे चार महिने असतो.

आषाढ शुद्ध एकादशीला भगवान श्रीविष्णू क्षीरसागरात शयन करतात. हा काळ चार महिन्यांचा असतो आणि कार्तिक शुद्ध एकादशीला ते पुन्हा जागृत होतात. या काळाला 'देवशयन' आणि 'देव जागृती' यामध्ये विभागले जाते. या काळात वातावरणात खूप रजतम वाढलेले असते. म्हणूनच चातुर्मासात, सण व्रतवैकल्ये उपासतापास, ग्रंथांचे पारायणे केली जातात. अनेक जण या काळात व्रत, नियम, संकल्प, उपवास करतात. चातुर्मासामध्ये धार्मिक कथा, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, भजन यांचे आयोजन केले जाते. चातुर्मासाचे आध्यात्मिक सोबत आरोग्यादायी सुद्धा महत्त्व आहे. पावसाळ्यात शरीरातील अग्नी मंदावतो. पचनशक्ती कमी झालेली असते. त्यामुळे वातुळ, जड पदार्थ खाल्ल्याने ते शरीराला हानिकारक ठरतात. त्यामुळे या काळात कांदा, लसूण, तेलकट पदार्थ, दही, जड पदार्थ टाळतात. उपवास, एकादशी व्रतांचे पालन केले जाते. वाईट सवयींवर संयम ठेवला जातो. या काळात सात्त्विक आणि हलका आहार घेतला जातो. चातुर्मासात साधुसंत एका ठिकाणीच स्थिर राहून प्रवचन, ध्यान, उपासना करतात. सत्संग, हरिपाठ, भजन-कीर्तनात सहभागी होणे, नामस्मरण करणे, साधना करणे, आध्यात्मिक उन्नतीसाठी फायद्याचे ठरते.

चातुर्मास म्हणजे केवळ एक धार्मिक परंपरा नसून, तो आपल्या मन, शरीर आणि आत्म्याच्या शुद्धीकरणासाठी हिंदू धर्माने दिलेली एक सुवर्णसंधी आहे.

**रेवती मुकुंद भोपी**/खामगाव

● ● ● ●

### परिवर्तनीय कायदा

कायदे बनताना तात्कालिक परिस्थिती लक्षात घेऊन भविष्यवेधाची कारणमीमांसा आणि त्यावर उपाय आणि शिथिल करण्याची तरतूद याच्याही नोंदी महत्त्वाच्या आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कुळ कायदा अमलात आणताना त्याचा फटका अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसला आणि ज्यांनी कुळ नाकारले तरी त्यांचे नावे कुळ सात-बारावर आजही असणे म्हणजे कायद्याचा हा दुरुपयोग आणि सामाजिक अप्रतिष्ठेचा कारण ठरतो. या अधिवेशनात तुकडाबंदी कायदा रद्द झाल्याने अल्पभूखंडाची खरेदी-विक्री करणे सोपे झाले असली तरी जुन्या कायद्यातील कारणमीमांसा का करण्यात आली नाही? की हा बिल्डरांच्या फायद्याचा बनाव तर नाही? कारण महसूल कायद्यान्वये एक हेक्टरच्या आतील जमीन ही तुकडाबंदी कायद्यांतर्गत आहे. संयुक्त कुटुंबात ही तुकडाबंदी हिस्सा वाटणीस अडचणीची होती आणि आजोबाच्या नावावरील सात-बारावर नातू शेतकरी शेती करीत आहेत. महसूल कायदा बनविताना त्याची कारणमीमांसा लोकांना माहीत असणे गरजेचे आहे. कारण उठसूट कायद्याला न्यायालयात आव्हान देणारे महाभाग या देशात आहेत. आताच मंजूर झालेला जनसुरक्षा कायदा हा न्यायालयाच्या उंबरठ्यावर आहे, जसे निस्तार हक्क कायदा १९६६, पेसा कायदा १९९६ आणि वनहक्क कायदा २००६. यामुळे सामाजिक अनुकूल व प्रतिकूल परिणाम यांची जाणीव ठेवून होणारा राष्ट्रीय सद्भाव जोपासला जाणे ही कायद्याची अंमलबजावणी असावी.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**
संभाजी ब्रिगेडचे प्रविणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे काही समाज कंटकांनी भ्याड हल्ला केला. या घटनेचा समविचारी बांधवाच्या वतीने जाहिर निषेध व्यक्त करुन सुत्रधारकांना अटक करावी अशी मागणी सोमवारी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. सामाजिक चळवळीमध्ये योगदान असलेले महाराष्ट्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व संभाजी ब्रिगेडचे प्रविणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट जि. सोलापुर यांच्यावर काही माथेफरू समाज कंटकांनी, भ्याड हल्ला करून काळे फासले आहे. ही घटना अत्यंत निंदनीय असून यातुन 'छत्रपती शिवराय, शाहू, फुले, आंबेडकर विचाराना दाबण्याचा पर्यंत होत आहे. या निंदनीय घटनेचा तिव्र निषेध व्यक्त करण्यात आला.महाराष्ट्रात अशा घटना होत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेतील सुत्रधारांना तात्काळ अटक करून भ्याड हल्लेखोरावर गंभीर कलमे लावुन कडक कार्यवाही करावी अशी मागणी सोमवार दि.१४ जुलै रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. तसेच या अशा घटना करणार्या माथेफेरूना आवर न घातल्यास आंदोलनात्मक मार्ग स्विकारला जाईल असा इशाराही दिलेल्या निवेदनात देण्यता आला आहे. या निवेदनावर ॲड.मनोज आखरे, खंडेराव सरनाईक, कल्याण देशमुख, शिवाजी पार्वती रामचंद्र पाटील, बाळासाहेब बोंगाणे, नामदेव कर्हाळे, दामोधर शिंदे, रमेश जाधव, शिवशंकर पठाडे, शिवाजी कराळे,गणेश शिंदे, गजानन जाधव, गोपालराव सरनायक आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# गंगा नगरमध्ये घराचे कुलूप तोडून चोरी, सोन्यासह रोकड लंपास

## ग्रामीण पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**
शहरानजीक कारवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत गंगा नगर भागात एका घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी घरातील १० ते १५ तोळे सोने तसेच रोख रक्कम पळविल्याची घटना सोमवारी दि १४ जुलै रोजी उघडकीस आली असून हिंगोली ग्रामीण पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे.
पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरानजीक असलेल्या गंगा नगर भागात कृषी विभागातील कर्मचारी प्रकाश साळवे यांचे निवासस्थान आहे. रविवारी दि १३ जुलै रोजी साळवे हे कुटुंबियांसह बाहेरगावी गेले होते. यावेळी घराला कुलूप होते. रात्रीच्या सुमारास घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी मुख्य गेट उघडून आत प्रवेश केला. त्यानंतर घराचे कुलूप तोडून वरच्या मजल्यावर गेले. त्याठिकाणी सर्व साहीत्याची नासधूस करून साहित्य अस्ताव्यस्त केले. मात्र कुठेही काही सापडले नाही त्यानंतर चोरट्यांनी लोखंडी कपाट फोडून त्यातील सुमारे १० ते १५ तोळे सोने व रोख रक्कम घेवून चोरट्यांनी पोबारा केला.
आज सकाळी कार्यालय असल्यामुळे साळवे हे बाहेरगावाहून आले. यावेळी घरी गेले असता घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. त्यांनी घरात पाहणी केली असता घरात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने हिंगोली ग्रामीण पोलिसांना माहीती दिली. ग्रामीणचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे, पोलिस निरीक्षक शामकुमार डोंगरे, जमादार बाळासाहेब खोडवे, आकाश पंडीतकर, प्रदीप राठोड, असलम प्यारेवाले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. पोलिसांनी ठसे तज्ञांना पाचारण केले असून घटनास्थळावरून चोरट्यांच्या हाताचे ठसे मिळविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. याशिवाय परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून चोरट्यांची ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलिसांनी सुरू केले आहेत.

# जिल्ह्यात एकाचवेळी मासरेडमध्ये अवैध दारूविक्रीवर छापे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**
जिल्ह्यात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध हातभट्टी दारू गाळप, विक्री व इतर अवैध दारू विरोधात विशेष मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सर्व पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस अधिकारी, दुय्यम अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे दुय्यम अधिकारी व अंमलदार, विशेष पथक यांनी जिल्ह्यातील अवैध हातभट्टी दारू



गाळप, विक्री व इतर अवैधदारू विक्रीचे समुळ उच्चाटन

करण्यासाठी अचानकपणे छापे मारून झडती घेवून ३२ गुन्हे दाखल करून ३२ आरोपींना ताब्यात घेवून ५६ हजार ५१८ रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून सदरची मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून अवैध दारू विक्रेत्यासोबतच अवैध दारू वाहतुक करणारे व बेकायदेशीरपणे दारूचा पुरवठा करणारे यांच्यावर सुध्दा गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे.



**हिंगोली– मागासवर्गीय शेतकऱ्यांची शेडनेट उभारणीबाबत संबंधीत कंपनी व महात्मा फुले विकास महामंडळ यांनी संगनमताने फसवणूक केल्याच्याविरोधात तसेच इतर मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रवादीचे गाव तेथे शाखा अभियानास प्रतिसाद



हिंगोली–गाव तेथे शाखा, घर तेथे सदस्य या संकल्पनेतून सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष बि.डी. बांगर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन रवी डोरले पाटील तालुकाध्यक्ष हिंगोली यांनी केले. या अभियानात जगन मापारी माजी सरपंच, दशरथराव सावळे, शेषराव कोळपे शेख चांद पाशा, उपसरपंच अलीम शेख, शेख सय्यद गुड्डू परमेश्वर सावळे, संदीप सावळे, जगन सावळे, मंचकराव कोळपे, गजानन सावळे, रामू सावळे, जयाजी मापारी, शिवाजी खांडेकर, संदीप सावळे, हनुमान कोळपे, नारायण सावळे, शेख असपाक, शेख पपु, सचिन सावळे, सचिन गावंडे, शेख वसीम, शेख शौकत, हिरामण दिपके, शेख ईसरील, सयद महेबुब, हनुमान सावळे, राजेंद्र दिपके, राजाराम पडघन, मधुकर धुळे, सय्यद मकसूद, शेख नूर, शेख जुनेद, शेख इरफान आदींची उपस्थिती होती.

### आयोध्याकडे दर्शनासाठी रामभक्त रवाना



हिंगोली– अयोध्या येथील श्रीराम मंदिर, काशी विश्वनाथ मनिकरनिका घाट मथुरा वृंदावन बाकी बिहारी अधिक ठिकाणी देवांचे दर्शन घेणार आहेत. बालाजी शेळके, ओंकार बांगर, गणेश सुडके, आदित्य शेळके राधेश्याम गोळे ,वैभव नागरे ,सोमनाथ घुगे, पवन कसबे, केदार भालेराव, अर्जुन गवळी यांच्यासह इतर देवदर्शन साठी गेले आहेत.

### मोटार सायकल चोरट्यास अटक

हिंगोली– स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंगवर असतांना मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे सापळा रचून आरोपी नीलेश गोपीचंद आलेवार रा सावळी तांडा यास बजाज पल्सर मोटार सायकल किंमती ४० हजार सह पथकाने अटक केली आहे. सदरील कारवाई सपोनि शिवसांब घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनि दिलीप मोरे, अंमलदार कोंडीबा मगरे, पांडुरंग राठोड आदींनी केली आहे.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गुरूपोर्णिमा उत्सव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**
राष्ट्रीय स्वयंसेवक सेवक संघ हिंगोलीच्यावतीने नेहमी प्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सव संपूर्ण जिल्हाभर साजरे होतात या वर्षी जिल्यातील सर्व नऊ तालुक्यात सुमारे १५० स्थळी हे उत्सव साजरे होणार असल्यामुळे सर्वत्र स्वयसेवकांमध्ये उत्साहचे वातावरण निर्माण झाले आहे.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या रचनेत सहा उत्सव साजरे करीत असतो. हिंदू वर्ष ची सुरुवात चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुडी पाडवा नंतर हिंदू साम्राज्य दिन हा साजरा केला जातो आणि वर्षाचा तिसरा उत्सव म्हणून गुरुपौर्णिमा हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वर्ष भर जे काही कार्यक्रम, अभ्यास वर्ग, बैठका आदी कार्यक्रम आणि इतर व्यवस्था चा खर्च हा केवल स्वयंसेवक यांनी गुरुपौर्णिमा निमित्त आपल्या गुरु भगव्या ध्वजाला प्रणाम करून आपले समर्पित धन राशीवर चालत असतो. या वर्षी आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक वस्ती, मंडल मध्ये हा उत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. हे वर्ष म्हणजे संघ स्थापने चे १०० वे वर्ष आहे त्यामुळे सर्व स्वयंसेवकांमध्ये फार उत्साहचे वातावरण दिसत आहे. आज पर्यंत सुमारे १५ उत्सव साजरे झाले असून येणाऱ्या २० जुलै पर्यंत सुमारे १२० उत्सव साजरे होणार असल्याचे जिल्हा प्रचार प्रमुख ॲड. दिलीप झंवर यांनी कळविले आहे.

# गणित अध्यापक मंडळाची जिल्हा कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**
खाकी बाबा इंग्लिश स्कूल येथे गणित शिक्षकांची जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या नवीन कार्यकारणीसाठी सभा घेण्यात आली. यावेळी जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.



कार्यकारणीत ज्येष्ठ गणित शिक्षक व माजी जिल्हा सचिव धीरज शर्मा यांची सर्वानुमते जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर सचिवपदी खाकी बाबा इंग्लिश स्कूलचे प्राचार्य व माजी परीक्षा प्रमुख शेख रहीम यांची निवड करण्यात आली.
त्यानंतर अध्यक्षांनी सर्वानुमते बाकी पदासाठी निवड करण्यात आली यात उपाध्यक्षपदी संजय खिल्लारे व अमोल कान्हेड तसेच सहसचिवपदी बाबासाहेब इंगोले तर सदस्य पदी मोहन पाटील, गजानन वैद्य, साहेबराव कऱ्हाळे, अशोक बंडे, आनंद मस्के, विलास जाधव, नागेश टाले, पठाण, तसेच सल्लागार म्हणून जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश मुठाळ, ज्ञानदेव श्रीमंगल यांची निवड करण्यात आली. जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे निर्वाचित सर्व पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय खिल्लारे यांनी केले तर आभार प्रदर्शन व सर्वांचे आभार नवीन अध्यक्ष धीरज शर्मा यांनी मानले.

# पावसाची विश्रांती, आंतर मशागतीला वेग, मजूर टंचाईमुळे शेतकऱ्यांची दमछाक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ जुलै**
औंढा नागनाथ तालुक्यात गेल्या दिवसापासून सुरू असलेल्या मध्यम स्वरूपाच्या पावसाने दोन दिवसापासून विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांनी आंतर मशागत तसेच निंदणीच्या कामाला सुरुवात केली आहे. औंढा तालुक्यात जून अखेर पावसाला सुरुवात झाली होती. मात्र सध्या मध्यम स्वरूपाचा पाऊस असल्याने रिपरिप सुरू होती. मात्र दमदार पाऊस झाला नसल्याने नदी नाले वाहते झालेच नाहीत. मात्र कमी अधिक प्रमाणात पाऊस होत असल्याने शेतामध्ये ओलावा निर्माण झाला होता. त्यामुळे परिसरात सर्वत्र चिखल होता. शेतकऱ्यांनी मिळेल त्या साधनाच्या आधारे पेरणी आटोपली होती. शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकाची पेरणी केली. जमिनीतील ओलावा अधून मधून पडणाऱ्या रिमझिम पावसाने पिकाची वाढ झाली. तसेच पिकात तण देखील वाढले. दोन दिवसापासून पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकरी मिळेल तेवढ्या मजुरांच्या मदतीने शेतातील निंदणी ,कोळपणीची कामे करीत आहेत. दरम्यान सध्या अनेक ठिकाणी मजुराची टंचाई भासत असल्याचे शेतकरी गजानन सोळंके यांनी सांगितले.गावातील काही मजूर बाहेरगावी जास्त मजुरी मिळत असल्याने कामासाठी दुसऱ्या गावात जात आहेत .या मजुरांचीने आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था देखील केली जात आहे. पिकाच्या वाढीसाठी आवश्यक पाऊस पडत असल्याने पीक ही भरभराटीला लागलेले आहे. मात्र पिकासोबत तण मोठ्या प्रमाणात होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत .दोन दिवसापासून पावसाने उसंत घेतल्याने शेतकरी मिळेल. त्या साधनाने आंतरमशागतीचे काम उरकून घेत आहे. यासाठी बैलजोडीचा आधार घेऊन मशागत करीत आहेत .त्यामुळे परिसरात मशागतीच्या कामांना वेग आला असल्याचे चित्र आहे. काही शेतकरी इतर रोगासंबंधी तणनाशकांची फवारणी करताना दिसून येत आहेत. तणनाशक मारून तणाचा नायनाट करण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांकडून होतआहे, जेणेकरून पिकाला तणनाशकाचा काहीहीदुष्परिणाम होणार नसल्याचे शेतकरी सांगत आहेत.



**हिंगोली– शहरातील गड्डीपीर गल्लीतील नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीला संकष्ट चतुर्थी निमित्त मोठ्या संख्येने भाविक सकाळपासूनच दर्शनाला रांगेत उभे होते. छाया– सुनील पाठक**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढा–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जुलै:**

नागरिकांना शासकीय सेवा जलद, पारदर्शकपणे आणि कालमर्यादेत मिळण्यासाठी राज्यसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यानुसार नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत मिळण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे विहित कालमर्यादेत तातडीने निकाली काढावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अधिकाऱ्यांना केल्या.



जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्यासह सर्व संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी विविध विभागांद्वारे निपटारा झालेली प्रकरणे आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. तसेच सर्व कार्यालयाच्या सूचना फलकावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ प्रसिद्ध करण्यात यावा. पोर्टलवरील प्राप्त तक्रारी विहित वेळेत निकाली काढाव्यात. प्रलंबित तक्रारीचा व निकाली काढलेल्या तक्रारींचा अहवाल कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास वेळेत सादर करावा, अशा सूचनाही कार्यालय प्रमुखांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी केल्या.

## श्री दत्त संस्थान बालाघाट येथे गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जुलै**



श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे गुरुवार दि. १० /०७/ २०२५ रोजी गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन दत्त उपासक शिंदे महाराज यांनी केले.दुपारी श्री दत्त महाराज व भोले शिवशंकर यांना दुग्ध अभिषेक करून गुरूची पाद्य पूजा केली.रात्री शिवाजी नगर उदंड वडगाव येथील भजनी मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम झाला

# कानेश्वर विद्यालय कानडी माळी येथे १९९९ – २००० इयत्ता १० वी बॅचचे स्नेह मिलन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१४ जुलै**



वर्षा मागून वर्ष सरत जातात शिक्षण करियर लग्न नोकरी या साऱ्या धकाधकीच्या जीवनात शाळा कॉलेजमधले वर्गमित्र मैत्रिणी ही अक्षरशः विखुरले जातात कित्येक वर्ष तर भेटही होत नाही फोन तर दूर.. कुठे असेल आता तो.. कुठे असेल आता ती.. हा प्रश्न सतत मनाला छळत असतो मात्र काळजा मधून आठवणी पुसत नाहीत.. आणि मग सोशल मीडियावर शोध सुरू होतो. त्या सर्व बालदोस्तांचा आणि भरतो कार्यक्रम गेट–टुगेदर चा...शाळेतल्या त्या मस्त आठवणी सरांच रागावणं, चिडणं, मारणं, चोरून डबा खाणं आठवतं आणि आठवतात एकमेकांना चिडवायच्या कितीतरी गोष्टी आणि मग उजाडतो तो गेट–टुगेदर चा दिवस आणि सुरू होते मौज मजा आणि आठवणींची हिरवळ कार्यक्रमाची.. आनंदाचे क्षण पुन्हा जगूया जुन्या आठवणींना जावूया शाळेच्या अंगणात फुलवलेली ती मौजमजा आज पुन्हा अनुभवूया चला मित्रांच्या गलक्यात हरवून जाऊया.. आजचा हा गेट–टुगेदर चा दिवस प्रत्येकासाठी खासच असतो कारण सगळेजण तर भेटणार असतात पण वर्गातल्या बेंचवर जगलेल्या आठवणी सुद्धा भेटणार असतात. मांगल्याचा नवचैतन्याचा आणि केलेल्या आठवणी सुद्धा हा नवचैतन्याचा आणि हर्षाचा प्रकाश आनंद घेऊन आला आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष गरडे सर , मुख्याध्यापक ,कानेश्वर विद्यालय , कानडीमाळी . यांची उपस्थिती होती तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक गवळी सर, गीते सर, खाडे सर,गिरी सर , मुख्याध्यापक, जि .प .उच्च प्राथमिक शाळा , कानडी माळी . श्रीमती शेळके मॅडम व आदर्श शिक्षक नरहरी काकडे सर उपस्थित होते. यावेळी मुलांनी शाळेतील त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच त्यांच्या जीवनातील शिक्षकांचा योगदान याबद्दल मनोगतही व्यक्त केले यावेळी सुधीर नाईकनवरे, सुनील राऊत, अनुराधा शिंदे, वंदना शिंदे, महादेव मस्के, विनोद राऊत, जालिंदर राऊत, मनोज काळे, माधव वाघमारे, सोनाजी काकडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या गुरुजनांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री नरहरी काकडे सर यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर नाईकनवरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री काकडे सर यांनी केले.

## जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाचे संघटन मजबूत करा – शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जुलै**

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषदा पंचायत समिती नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीची संघटना मजबूत करा असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे . बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माजलगाव मतदारसंघातील वडवणी ,धारूर ,माजलगाव व गेवराई विधानसभेतील मंडळाच्या या सर्व बैठका प्रसंगी ते बोलत होते. भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक कार्यासाठी आयोजित केलेल्या या सर्व बैठकांमध्ये बुथ बांधणी , शक्ती केंद्राची पुनर्बांधणी पासून मंडल कार्यकारिणी व लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीसाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व धारूरचे नगराध्यक्ष स्वरूप सिंह हजारी माजलगाव येथील भाजपाच्या राज्य परिषदेवर निवड झालेले अरुण राऊत जिल्हा सरचिटणीस प्रा. देविदास नागरगोजे, संजय आंधळे , श्रीकांत सानप आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. माजलगाव व गेवराई विधानसभेतील आठ मंडळाच्या या बैठकांमध्ये कार्यकर्त्यांनी पंकजाताई यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहाबद्दल साजरा करावा व बुथ रचना पूर्ण करून लवकरात लवकर मंडळ कार्यकारिणी पूर्ण करून द्याव्यात अशा प्रकारचे आव्हान जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी याप्रसंगी केले. पुढे बोलताना ते असे म्हणाले की



आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून या कार्य निवडणुकांसाठी मजबूत बुथ बांधणी करून , शक्ती केंद्र वॉरियर्स पासून ते पन्ना प्रमुखापर्यंत सर्व संघटनात्मक बांधणी लवकरात लवकर पूर्ण करावी व मंडल कार्य कारीण्या देखील लवकर कराव्यात अशा प्रकारचे आव्हान या प्रसंगी त्यांनी केले. या सर्व बैठकांमध्ये भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे यांनी संघटनात्मक बांधणीचे महत्त्व सांगून प्रमुख पदाधिकाऱ्यांनी लवकरात लवकर मंडळ कार्यकारिणी पूर्ण कराव्यात अशा प्रकारचे आव्हान केले या सर्व बैठकासाठी वडवणी येथे उपनगराध्यक्ष बन्सी मुंडे , मंडला अध्यक्ष सुखदेव रेडे, चोले दादा, मच्छिंद्र झाटे ,ईश्वर तांबडे, धनंजय मुंडे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते तर धारूर मंडळाच्या बैठकीत नगराध्यक्ष डॉ. स्वरूप सिंहाचारी , एँड. बाळासाहेब चोले ,दत्ता धोत्रे , अँड .भोसले रामचंद्र मुंडे यांच्यासह मंडलाध्यक्ष काचगुंडे हे उपस्थित होते .माजलगाव येथील बैठकीत मंडलाध्यक्ष रूपालीताई कचरे ,विनायक रत्नपारखी, डॉ. अभिजीत सोळंके ,माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके , अभय भैया ओके , यांचेसह माऊली सरवदे , दत्ता महाजन ,ज्ञानेश्वर नाना मेंडके, ईश्वर खुरपे, आधी पदाधिकारी उपस्थित होते तर गेवराई येथील बैठकीत मंडलाध्यक्ष प्रकाश सुरवसे,सुरेश हात्ते, अशोक शिंदे,उद्धव रासकर, राजेश पवार, सचिन दाभाडे, ज्ञानेश्वर खाडे,महादेव धोंडरे,बळीराम कऱ्हे, देविदास खरात,बाबा पिसाळ,महादेव बारगजे,महादेव खटके,संतोष थोरात, कृष्णा ढाकणे,प्रदीप उगलमुगले, परमेश्वर राठोड, यांचे सहप्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबिराचा लाभ घ्यावा–डॉ.संतोष मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१४ जुलै**

आ.धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त डॉ. संतोष मुंडे यांच्या श्रीनाथ हॉस्पिटल परळी वैजनाथ येथे भव्य मोफत कृत्रिम हात, मॉड्युलर पाय ,कुबड्या व कॅलिपर्स वाटप शिबिराचे आयोजन आज दिनांक १५ जुलै मंगळवार रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले आहे.



आ.धनंजयजी मुंडे यांच्या मार्गदर्शनातून रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व धनंजयजी मुंडे आरोग्य मित्र योजना तसेच दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती या शिबिराचे मुख्य आयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष तथा धनंजय मुंडे आरोग्य मित्र योजनचे अध्यक्ष डॉ. संतोषजी मुंडे यांनी दिली.दिव्यांगाचे कैवारी म्हणून ओळख असणारे तसेच विविध सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर राहून विविध आरोग्य शिबिरे व दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबवणारे त्याचबरोबर प्रसंगी दिव्यांगाच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष तथा धनंजय मुंडे आरोग्य मित्र योजनेचे अध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या अथक प्रयत्नातून या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा परळीत जाहीर निषेध



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१४ जुलै**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी दीपक काटे यांच्यासह इतरांनी केलेल्या हल्ल्याचा परळी येथे निषेध करण्यात आला. पुरोगामी चळवळीचे नेते तसेच महाराष्ट्राला या संघटनेने दंगलमुक्त केले हजारो तरुणांचे मस्तक सशक्त करून त्यांच्या हातातील लाठ्या–काठ्या काढून त्यांच्या हाताला उद्योगधंदे, लेखणी पेन्सिल, देणारे हजारो तरुणांना विदेशामध्ये उद्योग धंद्यासाठी व नोकरीसाठी पाठवणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर हा हल्ला नसून तो पुरोगामी चळवळीवर हल्ला झाला आहे. महाराष्ट्र राज्यासाठी योगदान असलेल्या अनेक लोकांवर सातत्याने होत असलेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राला अस्थिर करण्याचे षडयंत्र विशिष्ट प्रवृत्तीचे लोक करत आहेत. म्हणून राज्य सरकार व गृहमंत्री हे अपयशी ठरले आहेत. या प्रकरणांमध्ये गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा व या हल्लेखोरांवर कायद्याअंतर्गत कारवाई करावी. अशी मागणी निषेध करते वेळी करण्यात आली. या प्रसंगी मिलिंद घाडगे, सेवकराम जाधव, देवराव लुगडे महाराज, नितीन शिंदे, विश्वनाथ गायकवाड, मोहसीन शेख, शिवाजीराव देशमुख, यशवंत सोनवणे केशवराव मुंडे, दिनेशराव गजमल,गौतम साळवे, ड अर्जुन सोळंके, प्रकाश मुंडे, अल्ताफ भाई, केशव कांबळे, राजेभाऊ सोळंके, हनुमान दिवटे, विजयकुमार कस्तुरे यांच्यासह सामाजिक, राजकीय क्षेत्रातील पुरोगामी विचाराचे मान्यवर उपस्थिती होते.

# मैं बीज हुं, आदत है मेरी, बार बार उग जाने की!



**कवितेच्या ओळी अनुषंगिक वाटत असल्या तरी त्या तंतोतंत लागू पडणाऱ्या आहेत. त्याचं कारण असं आहे की, धनंजय मुंडे हे नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न होण्याची ही काही पहिली वेळ नाही! तसं यावेळी जरा अतीच झालं म्हणावं लागेल मात्र अशा प्रकारचे आघात हे या व्यक्तीसाठी काही नवीन नाहीत. आयुष्यात लढविलेली पहिली जिल्हा परिषद निवडणूक ही त्या सुप्त संघर्षाची सुरुवात होती, सोप्या आणि जवळच्या जागा सोडून त्या काळी म्हणजे २००२ साली बीड जिल्ह्याची गडचिरोली म्हणवल्या जाणाऱ्या पट्टीवडगाव सर्कल मधून लढावे लागले. कदाचित संघर्ष हा यांच्या पाचवीला पुजलेला असावा, त्यामुळे आजवर जे मिळाले त्यातले सहज हाती लागले असे काहीच नाही.**

कधी नियतीने तर कधी व्यक्ती द्वेषाने धनंजय मुंडे यांना अनेक हल्ले सहन करून प्रतिहल्ला न करता संयमाने परतवून लावावे लागले; याची शेकड्याने उदाहरणे देता येतील. पण त्या प्रत्येक आघातातून कुणालाही न दुखावता किंवा फारसे डॅमेज न होऊ देता अत्यंत धीरोदात्त पणे लढून धनंजय मुंडे इथपर्यंत पोचले. त्यात सगळ्यात मोठा वाटा प्रभू वैद्यनाथ नगरी अर्थात परळीतील जनतेचा आहे. आजवर परळीची ही माय बाप जनता प्रत्येक वेळी, प्रत्येक संघर्षात धनंजय नावाभोवती एक अभेद्य तटबंदी बनून उभी राहिली आहे.

म्हणूनच नेहमी म्हटले जाते की एखादे नेतृत्व घडायला अनेक दशके लागतात, अनेक प्रकारचा त्याग, बलिदान, उपासना आणि संघर्ष त्यामागे दडलेला असतो. ज्याने या सर्व गोष्टी सहन केल्यात त्याला संपवण्याची सुपारी तितकी सोपी नाही!

लोकसभा निवडणुकीतील धनंजय मुंडे यांचे समर्पण सर्वांनी डोळ्यांनी पाहिले. निसटता पराभव झाला तो स्वीकारून पुन्हा ते कामाला लागले. विधानसभा निवडणुकीत इतर मतदारसंघात ३२ पेक्षा अधिक सभा घेतल्या. इतकेच नाही तर स्वतः उमेदवार असून सुध्दा अगदी मतदानाच्या आदल्या रात्री अगदी पहाटेच्या दोन वाजेपर्यंत आपल्या गेवराई च्या बंधूंच्या प्रचारार्थ बैठका घेत होते. परळीच्या अभेद्य किल्ल्याने धनंजय मुंडे या नावाभोवती महाराष्ट्रातील क्रमांक दोनची लीड उभी केली. त्यादिवशी अनेकांनी बांगड्या फोडल्या... अनेक आरोप केले त्या सर्वांच्या तोंडावर स्वतः निवडणूक आयोगाने क्लीनचीट चिटकवली, तरीही बदनामी सुरूच! पण खवळलेला विरोध आणि संपवायची सुपारी परळी पासून शेकडो किलोमीटर वरती शिजत होती; त्यांना हवी होती फक्त एक संधी!

जिल्ह्यात घडलेल्या एका दुर्दैवी घटनेच्या आडून अशी काही संधी साधवून घेतली की.... बापरे! १६५ दिवस एका सर्वसामान्य नेतृत्वाला संपवण्यासाठी मीडिया ट्रायल? देशात कधी आजवर झाली नसेल; किती मोठमोठे आहेर कुणाकुणाला देण्यात आले, याची अनेकांना कल्पना आहे. खाजगीत विरोधक सुध्दा आता ते बोलून दाखवतात. किंबहुना आता सर्वसामान्य जनतेला सुध्दा ते कळून चुकलं आहे.

जातीयवादाचा ठपका ठेवून बदनामी, घोटाळ्यांचे आरोप ध चा म करून बातम्यांची पेरणी तर इतकी की अगदी पिंपळाचे पान गळाले अशी वस्तुस्थिती असताना धनंजय मुंडे यांच्या मुळे पिंपळगाव जळले, अशा बातम्या दाखवून त्यावर डिबेट घडवून आणल्या गेल्या... अगदी, आई, भाऊ, मुली – बाळी यांच्या पर्यंत बदनामी? कशासाठी? उत्तर आहे केवळ सुपारी! या व्यक्तीला राजकारणातून संपवायचे याची सुपारी!

धनंजय मुंडे या माणसाला मुळात कधी जात शिवलेली नाही, महापुरुषांच्या जयंती मध्ये भाषणे



करताना ते आवर्जून सांगतात की महापुरुषांच्या कार्याचा आदर्श घ्या, त्यांना जातीत वाटून घेऊ नका. इतकेच काय तर राजकारणात संधी देताना सोशल इंजिनिअरिंग साधावी ती धनंजय मुंडे यांनीच! त्याचीही शेकडो उदाहरणे सांगता येतील. पण नाव सांगितले की त्याची जात शोधायची ही पद्धत सध्या सुरू आहे, त्यामुळे नाव टाळलेले बरे. विरोधीपक्षनेते, आमदार, मंत्री अशा विविध पदांवर काम करताना, त्यांच्या सभोवती सर्वाधिक अधिकारी कर्मचारी हे मराठा समाजाचे राहिले आहेत. त्यामुळे जातीचे लेबल लावून त्यांची बदनामी करणे म्हणजे अत्यंत छोटी सोच ठरेल.

मीडिया ट्रायल, व्यक्तिगत आरोप, बदनामी हे सगळे इतक्या टोकाला पोचवले गेले की त्यांचा परिणाम स्वतःच्या तब्येतीवर सुध्दा झाला. ज्या माणसाच्या जिभेवर माता सरस्वती वास करते, त्या व्यक्तीला एका आजारामुळे जवळ जवळ तीन महिने बोलता येईना, सतत माणसात राहणे, बोलणे, भाषणे, संवाद अशी आयुष्याची शिदोरी असलेल्या व्यक्तीला तीन महिने बोलता येत नाही, तेव्हा त्यांच्या मनाला त्याच्या किती वेदना होत असतील? पण दुसरीकडे राजीनामा आणि दीर्घकाळ मुंडेंचे मौन याचा अर्थ सुपारी बहाद्दर गँग ने काढला की आता धनंजय मुंडे संपले!

राज्यात स्वकर्तृत्वावर मोठे झालेले व आपल्या पक्षासह मित्रपक्षात देखील तितकेच वजन असणारे धनंजय मुंडे हे नाव गप्प बसणाऱ्या किंवा सहज सर्वकाही मागे सोडून देणाऱ्यापैकी नाही. याची प्रचिती आगामी निवडणुकांच्या काळात येईलच! निष्ठावंत कार्यकर्त्यांची मजबूत फळी, बेरजेचे राजकारण, मोकळे व मोठे मन आणि फर्डे वक्तृत्व कौशल्य ही राजकारणात कायमच त्यांची जमेची बाजू राहिलेली आहे. त्यामुळे मुंडे यांचे मौन आता अल्पकालीन आहे, हे स्पष्ट आहे आणि त्याची प्रचिती सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दिसून आली.

आजवर झालेले घात – आघात सहन करून त्यातून वाट काढत धनंजय मुंडे हे पुन्हा एकदा सुपारी देणाऱ्या आणि घेणाऱ्यांचे दात घशात घालून नवी उसळी घेणार आणि पूर्वीपेक्षा अधिक जोमाने, अधिक उत्साहाने राजकारणातील राजहंस बनण्याच्या मार्गावर मार्गक्रमण करणार हे निश्चित आहे.

मागील वर्षी एका भाषणात ते म्हणले होते,

कई लोगों ने कोशिश की, मुझे मिट्टी मे दबाने की,

मैं बीज हुं, आदत है मेरी, बार बार उग जाने की!

या काव्यपंक्ती प्रमाणे निश्चितच जितक्या वेळा धनंजय मुंडेंना दाबण्याचे, संपवण्याचे प्रयत्न होतील, तितक्याच ताकदीने ते पुन्हा उसळणार आणि एक लोकमान्य लोकनेतृत्व होण्याच्या दिशेने गतिमान वाटचाल करणार... हे नक्की आहे!

सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शब्दरूपी शुभेच्छा!

**सुधीर सांगळे, बीड**

# जानकीच्या आनंदाला दिव्यांग, वृद्धांच्या आशिर्वादाची किनार

## पोखरकर परिवाराची बांधिलकी ; दिव्यांग, वृध्दांना दिले व्हिलचेअर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१४ जुलै**



येथील पोखरकर परिवाराकडून पुन्हा एकदा बांधिलकी जोपासत दिव्यांग, वृध्दांना दिले व्हिलचेअर देण्यात आले. जानकी राजेंद्र पोखरकर हिचे अभिष्टचिंतन करीत जानकीच्या आनंदाला लाभली दिव्यांग, वृद्धांच्या आशिर्वादाची किनार लाभली.

हल्लीच्या काळात वाढदिवस साजरा करताना विविध गोष्टींवर भरमसाठ खर्च केला जातो. मात्र, या गोष्टींपेक्षा सामाजिक जाणीव ठेवत, समाजासाठी काहीतरी चांगले करून वाढदिवस साजरा करणे अधिक अर्थपूर्ण ठरते. येथील राजेंद्र पोखरकर यांनी त्यांची कन्या जानकी हिच्या ४ थ्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दिनांक ११ जुलै रोजी वयोवृद्ध, दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. समाजामध्ये अशा विविध समाज घटकांना आधार देण्याचं काम टायगर ग्रुप मराठवाडा अध्यक्ष गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर यांच्या संकल्पनेतून आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. राजेंद्र पोखरकर यांनी आपली मुलगी जानकी हिचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याच्या प्रेरक कृतीचे सर्वस्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. यावेळी पोलीस मित्र संघटनेचे पदाधिकारी, गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर, राजेंद्र भैय्या, दिपक लामतुरे, बालाजी रूद्राक्ष, कोंडीराम पवार, आदित्य देशमुख, दीपक पवार, स्वप्नील सोनवणे, तिरूपती राठोड व संपूर्ण पोखरकर कुटूंबिय, नातेवाईक आणि मित्र परिवार उपस्थित होता.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सर्वसामान्यांना खाक्या दाखवण्यापेक्षा अवैध धंद्यांना लगाम लावा!

## पोलीस निरीक्षक भारती साहेब हप्ते वसुली करणाऱ्या तुमच्या मुजोर कर्मचाऱ्यांना आवर घाला!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरात अवैध धंदे बोकाळले असून कमिशन (वसुली) व राजकीय दबावापोटी सदरक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीद वाक्याला सदर बाजार पोलीस गुंडाळून ठेवणार का? बसस्थानक परिसरापासून ते पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सध्याही अवैध धंदे जोमात सुरू आहेत. बसस्थानकात कॅमेरे लावले असतांनाही चोर प्रवाशांचे खिसे कापतात आणि गायब होतात. पोलीसांना त्यांचा शोध देखील लागत नाही. का लागत नाही कारण चोरट्यांचे सरदारच पोलीस प्रशासनातील काही कर्मचारी असल्यामुळे या सर्व प्रकरणाला मोठे बळ मिळत आहे. सर्वसामान्यांना खाक्या दाखवण्यापेक्षा अवैध धंद्यांना लगाम लावा आणि हप्ते वसुली करणाऱ्या तुमच्या मुजोर कर्मचाऱ्यांना आवर घाला अशी मागणी होत आहे.

शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू असून यामध्ये मटका, सट्टा, ऑनलाईन लॉटरी, वेश्या व्यवसाय, रात्री उशीरापर्यंत राजरोसपणे बार उघडे असणे, कोणत्याही टपरीवर जा दारू, गुटखा यासह काही ठिकाणीतर गांजा आणि आपल्याला जे लागेल ती गोष्ट पुरविल्या जात आहे. त्याकडे या पोलीस प्रशानातील अधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांचा कानाडोळा का? कारण या सर्व अवैध धंद्यामधून लाखोंची वरची कमाई या पोलीस ठाण्याला महिण्याकाठी मिळते. सदर



बाजार पोलीस ठाण्याअंतर्गत तर सफसेल वसुलीसाठी दोन-तीन कर्मचाऱ्यांची नियुक्तीच केली अश्या पध्दतीने हे कर्मचारी वसुली करतात. सर्वसामान्य जनतेचे रक्षण करणे सोडून अवैध धंद्यावाल्यांचे रक्षण करण्यासाठी सदर बाजार पोलीसांची टिम सक्रीय झाली आहे का असा प्रश्न आता सामान्य नागरीकांतून उपस्थित केला जात आहे. गेल्या काही वर्षात तरुणाईमध्ये वाढत असलेल्या कमी गुंतवनुक करून जास्त नफा कमावण्याच्या मानसिकतेमुळे अवैध धंद्याकडे अनेक तरूणांचा कल वाढला आहे. त्याचाच फायदा घेत शहरात अवैध धंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे. अशा धंद्याकडे तरूणांचा वाढलेला कल आणि पोलिस विभागाकडून त्याकडे करण्यात येणारे दुर्लक्ष यामुळे अवैध धंद्यांना जणु मोकळे रानच मिळाले आहे. शहरातील विविध भागात सुरू असलेल्या या अवैध धंद्यांमुळे आता शहरातील अवैध धंद्यांना पोलिसांनी 'परवानगी'च दिली की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये उपस्थित केल्या जात आहे. मात्र, या नादात पैसा मिळवण्यापेक्षा गमावणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यातुनच कर्जबाजारीपणा आणि नशेच्या आहारी जाणारे तरुण अनपेक्षितपणे गुन्हेगारी कडेही वळत आहे. त्यामुळे या प्रकरणी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल हे तरी अशा मुजोरखोर आणि वसूली करणाऱ्या पोलीसांना समज देतील का? अत्सा प्रश्न या निमित्ताने उपस्थित करण्यात येत आहे.

## आईसोबत वाद झाला आणि तळीरामाने थेट स्वतः ची दुचाकी पेटवली!



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

आठवडी बाजारात आई सोबत खरेदी करण्यासाठी भोकरदन शहरात एका तळीरामाचा आई सोबत वाद झाल्याने त्या तळीरामाने चक्क स्वतः ची मोटारसाइकल पेटवून दिली, ही घटना ता . १२ शनिवार रोजी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर घडली, रामेश्वर वनारसे राहणार फत्तेपुर तालुका भोकरदन असे या तळी रामाचे नाव असून भोकरदन पोलिसानी त्याला ताब्यात घेतले आहे .दरम्यान, रामेश्वर वानरसे हा मद्यधुंद अवस्थेत होता त्याच्या आई सोबत बाजारत आला होता, त्याचा आई सोबत वाद झाल्याने येथील प्रत्यक्ष दर्शनीनि
सांगितले,आई सोबत वाद सुरू असतानाच त्याने सिनेस्टेइलन स्वतः ही मोटरसायकल चौकात उभीकरून तिच्यावर पेट्रोल ओटले आणि सिगारेट पेटवून मोटार सायकल पेटवून दिले , अचानक अचानक प्रकरणामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती,दरम्यान, या घटनेची माहिती पोलिसाना मिळताच पोलिसानी घटनास्थळी धाव घेऊन दुचाकीला लावलेली आग विझवली, यावेळी दुतर्फी झालेली गर्दी सुरळीत करूनया तळीरामाला पोलिसानी ताब्यात घेतले.

## आळंद येथील अंगणवाडीची भिंत कोसळली



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधि**

जाफ्राबाद तालुक्यातील आळंद येथील अंगणवाडीची बाहेरील व आतील भिंत पावसामुळे कोसळण्याची घटना शुक्रवारी रात्री (ता.११)भिंत कोसळ्यामुळे तालुक्यातील आंगणवाडीत शिकत असलेल्या मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न उघडकीस आला. सुदैवाने रात्रीची वेळ असल्यामुळे मोठा अनर्थ टळला अंगणवाडीत शिक्षण घेत असलेल्या मुलांना आता उघड्यावरच बसावे लागणार...का गावात पर्यायी आंगणवाडी ची खोली बांधण्यात आली असुन ती गावापासून दुर असल्यामुळे जिरन्न झालेल्या गावातील लहान मुलाना जिव मुठ्ठीत घेऊन त्या खोलीतच मुलांना बसावे लागत होते.गावातच लहान मुलांना पर्यायी आंगणवाडी ची खोली बांधुन द्यावी असी मांगणी आंगणवाडी सेविका कमल रुस्तुम पुंगळे यांनी केली.बरेच दिवसापासुन आंगणवाडी ची दुरव्यस्था झालेली होती सम्नधीत विभागास आम्ही वेळोवेळी माहीती व पाठपुरावा करुनही विभागाने या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यामुळेच हि घटना घडली. असा आरोप युवा सेना तालुकाप्रमुख उपप्रमुख उमेश गायकवाड यांनी केला आहे .

## योगेश सरकटे व अश्विनी कांगणे यांची महसूल सहायक पदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळणी येथील योगेश बाळकृष्ण सरकटे . वाघाळा येथील कु अश्विनी गजानन कांगणे यांची लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत महसूल सहायक पदी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरावरून अभिनंदननाचा वर्षाव होत आहे



## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला शिवसेनेचा आर्थिक आधार

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील बाबुलतारा येथील शेतकरी राजेभाऊ देविदास काळे यांनी दुष्काळ, नापिकी आणि बँकेचे ८० हजार कर्ज यामुळे नुकतीच आत्महत्या केली. काळे हे केवळ एक एकर जमिन कसून आपला व परिवाराचा उदरनिर्वाह करत होते. त्यांचे वय फक्त ३२ वर्ष होते. राजेभाऊ यांच्या पश्चात वयोवृद्ध आई - वडील, पत्नी, एक १० वर्षाचा मुलगा व एक १४ वर्षाची मुलगी आहे.

जेव्हा एखादा शेतकरी आत्महत्या करतो तेव्हा त्याचे कुटुंब उद्धस्त होते. राजेभाऊ काळे यांनी आत्महत्या केल्यामुळे काळे कुटुंबाला दुःख आणि दुःखाचा सामना करावा लागत असताना त्यांना नैतिक आणि मानसिक आधार देण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख महेशभैय्या नळगे व उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम यांनी सांत्वन पर भेट दिली. व शेतकऱ्याच्या पश्चात संकटात सापडलेल्या काळे कुटुंबाला स्वनिधीतून आर्थिक मदत देत शिवसेनेचा माणुसकीचा हात पुढे केला. या भेटीद्वारे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केवळ सहानुभूतीच नव्हे तर हक्काचा आधार दिला. शेतकरी आणि कुटुंबासाठी शिवसेना नेहमीच सज्ज आहे, हे अधोरेखित केले. याप्रसंगी गावकरी शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



## शिवरायांच्या गडकोटांचा जागतिक सन्मान!

### भाजपा महानगर जिल्ह्याच्या वतीने आनंद उत्सव साजरा




**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आज जालना येथील भाजपा महानगर जिल्हा कार्यालयात एक ऐतिहासिक व अभिमानास्पद क्षणाचा आनंद साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा गौरव गाथा सांगणारे आणि महाराष्ट्राच्या शौर्याची साक्ष देणारे १२ ऐतिहासिक किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये अधिकृतपणे समाविष्ट करण्यात आले आहेत.
या यादीत राजगड (स्वराज्याची पहिली राजधानी), रायगड (दुसरी राजधानी), शिवनेरी (शिवजन्मभूमी), प्रतापगड, लोहगड, खांदेरी, पन्हाळा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, साल्हेर आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत आज जालना येथे भाजपा महानगर जिल्हा कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे भरून जल्लोष करून आनंदोत्सव साजरा केला. उपस्थित कार्यकर्त्यांनी हा क्षण देशाच्या वैभवशाली इतिहासाच्या सन्मानाचा असल्याचे सांगितले. भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले व म्हटले की, शिवछत्रपतींच्या गडकोटांचा जागतिक स्तरावर झालेला सन्मान म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रासाठी गौरवाची गोष्ट आहे. हे निर्णय नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत.
यावेळी भाजपा मंडळ अध्यक्ष महेश निकम, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, सरचिटणीस सुनील पवार, ओबीसी जिल्हाध्यक्ष कपिल दहेकर सखुबाई पणबिसरे, ममता कोंड्याल, राधा देविदास देशमुख, राजेश जोशी, सिद्धेश्वर हाजबे, वसंत शिंदे, डोंगरसिंग साबळे, सय्यद इम्रान, दत्ता जाधव, सतीश केरकळ, विजय जाधव, बद्रीनाथ वाघ, नागेश अंभोरे, दौलत भुतेकर, शाम जाधव, शाम उगले आदींची उपस्थिती होती.

## आत्मचिंतन व अध्यात्मिक उन्नती साठी चातुर्मास -प.पू. डॉ.प्रतिभाजी मा.सा.

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

आत्मचिंतन व अध्यात्मिक उन्नती साठी चातुर्मासाचे महत्व असल्याचे प.पू. डॉ . प्रतिभाजी मा.सा यांनी यावेळी सांगितले चातुर्मासामुळे मुनी , महाराजांचा, सतीया जींचा आदी तपस्वींची मंगल विहार पदयात्रा थांबत असून तपस्वी ज्या स्थळी असतील,. त्या स्थळी वर्षा योग किंवा वरुण योग अर्थात चातुर्मास स्थापना करतील अशी माहिती प.पू डॉ. गौरवमुनीजी यांनी दिली त्यांचा या चातुर्मासात निरंकार १८ वा उपवास असून त्यांनी आध्यात्मिक बरोबर योगा, प्राणायाम साधना असे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत बदनापूर तालुक्यातील गोकुळवाडी येथिल वर्धमान गणेश प्रतिष्ठान साध्वी प्रतिभानगर येथे आध्यात्मिक चातुर्मास प्रसंगी डॉ प.पू प्रतिभाजी मा.सा यांनी सांगितले की,जैन धर्मात चातुर्मासाला खूप महत्व आहे. या काळात जैन साधू-साध्वी एकाच ठिकाणी थांबून धार्मिक कार्ये, प्रवचन आणि आराधना करतात. यावर्षी चातुर्मास आषाढ महिन्यातील एकादशीपासून सुरू होत आहे.
चातुर्मास म्हणजे चार महिन्यांचा काळ, जो आषाढ महिन्याच्या एकादशीपासून कार्तिक महिन्याच्या एकादशीपर्यंत असतो. या काळात



जैन साधू-साध्वीजी एकाच ठिकाणी थांबतात आणि आपले धार्मिक कार्य करतात.

धार्मिक कार्यांना महत्व: चातुर्मासात धार्मिक कार्यांना विशेष महत्व दिले जाते. जैन साधू-साध्वी प्रवचन, कीर्तन, आणि धार्मिक कार्यांमध्ये व्यस्त असतात. आत्म-चिंतन आणि संयम:या काळात जैन लोक आत्म-चिंतन आणि संयम पाळण्याचा प्रयत्न करतात.अहिंसक जीवनशैली: चातुर्मासात जैन लोक अहिंसक जीवनशैलीचा अवलंब करतात.. जैन बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. अनेक ठिकाणी चातुर्मास मंगल प्रवेश कार्यक्रम आयोजित केले जातात. धार्मिक स्थळांना भेट देणे.प्रवचन आणि कीर्तन ऐकणे. दान-धर्म करणे. अहिंसक जीवनशैलीचा अवलंब करणे. आत्म-चिंतन करणे. चार महिने एकाच ठिकाणी तपस्वींचे वास्तव्य राहणार असून पैशापेक्षा धर्म महत्त्वाचा आहे,'' असे उद्गार चातुर्मासानिमित्त डॉ. प.पू गौरव मुनीजी, यांनी काढले. यावेळी पुढे ते म्हणाले की ''अपेक्षा ठेवली की निराशा मिळते, त्यामुळे अपेक्षा न ठेवता कष्ट करणे व काम करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवले की आपली अपेक्षापूर्ती होते. स्वतःला बदलण्याचा मार्ग संयम जीवनामधून जातो. यासाठी प्रत्येकाने धर्माला महत्त्व द्यावे व आपल्या आयुष्याला कलाटणी देऊन आपले जीवन सार्थक करावे.''चातुर्मास हा जैन धर्मात एक महत्वाचा काळ आहे, जो आषाढ शुद्ध एकादशीपासून दकार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत किंवा आषाढ पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत असतो. या काळात जैन साधू-संन्यासी एकाच ठिकाणी थांबून प्रवचन, धार्मिक कार्यांमध्ये आणि आत्मचिंतनात वेळ घालवतात. चातुर्मासात जैन साधूंसाठी काही विशेष नियम आणि आचारसंहिता असते, ज्यांचे त्यांना पालन करावे लागते. चातुर्मास हा जैन धर्मात आत्मचिंतन, धार्मिक कार्यांसाठी आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वाचा मानला जातो. एकंदरीत, चातुर्मास हा जैन धर्मात एक महत्वाचा काळ आहे, जो आत्मचिंतन, धार्मिक कार्यांसाठी आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी समर्पित असतो.असे त्यांनी यावेळी सांगितले या चातुर्मास च्या काळात विद्यार्थ्यांना मोफत योगा, प्राणायाम ,साधना आदी विविध प्रकारच्या योग साधना घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## अंगणवाडीचे बांधकाम पूर्ण करण्या आधीच बिल उचलणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

आलापुर, रामपुर येथे २५१५ योजने अंतर्गत जवळपास अकरा लाख पंचवीस हजार रुपयांचे अंगणवाडी बांधकांम मंजुर करण्यात आले होते. मात्र सदर काम घेणारा ठेकेदार आणि काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी हातमिळवणी करून सदर अंगणवाडी बांधकाम अपूर्ण ठेऊनच जवळपास शंभर टक्छे बिल उचलण्यात आले आहे. सदर बिल उचलण्यसाठी मस्टर असो अथवा मॅनेजमेन्ट बिल यावर सदर इंजिनिअर आणि ग्रामसेवक यांनी आर्थिक हातमिळवणी केल्यामुळेच सदर ठेकेदाराने हे बील उचलले असून अशा ठेकेदार आणि संबंधीत बिल काढुन देण्यास मदत करणारे भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना दलीत आघाडीचे तालुका प्रमुख बाबासाहेब पगारे यांनी केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, सदर अंगणवाडीला खिडक्या आणि दरवाजे नसल्याने अंगणवाडीचे आणखीनच हाल झाल्याचे दिसून येत असुन परिसरातील लहान विद्यार्थ्यांनाही शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान सदर अंगणवाडी बांधकाम प्रकरणात अपहार करणाऱ्या इंजिनिअर आणि ग्रामसेवक यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी नसता २१ जुलै रोजी बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचेही दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## मराठा समाजाने शिक्षण, उद्योगात अग्रेसर व्हावे -आ.अर्जुनराव खोतकर

### स्वा.सै.रामभाऊजी राऊत मराठा समाज सभागृहाचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

वटवृक्षाप्रमाणे अठरापगड जातींना सोबत घेऊन जाणारा मराठा समाज केवळ ग्रामपंचायत ,सोसायटी, पंचायत समिती ,जिल्हा परिषद ,महानगरपालिका, निवडणुका लढवून पदे मिळवण्यातच अडकून पडला आहे शिक्षणाप्रती हवी तशी जागृती समाजात दिसत नाही मराठा समाजाने शिक्षण, प्रशासन, उद्योग, व्यापारात, अग्रेसर व्हावे असे आवाहन विधानमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी केले. तथापि जालना शहरात मराठा समाजासाठी सुसज्ज सभागृह उभारणी करिता कोट्यवधींचा निधी देऊ, प्रसंगी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देखील आ. खोतकर यांनी दिली.

शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांच्या विशेष प्रयत्नांतून



काद्राबाद परिसरातील राजमहल टॉकीज लगत स्वा. सै. रामभाऊ जी राऊत मराठा समाज सभागृहाचे उद्घघाटन रविवारी ( ता.१३) आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठा समाज मंडळाचे अध्यक्ष अंकुशराव राऊत, कार्याध्यक्ष विष्णू पाचफुले, वामनराव राऊत, गणेश राऊत, राजेश राऊत, विमलताई आगलावे, ज्ञानदेव पायगव्हाणे,रमेश गौरक्षक, राजेंद्र गोरे, संजय देठे,अरविंद देशमुख, अशोक पडूळ, भरत मानकर,रामदास जाधव,ओमप्रकाश भिसे, दत्ता काकडे,दिगंबर पेरे, राजाभाऊ गाजरे,सतीश जाधव, सुभाष चोपडे, विठ्ठल शिर्के, दीपक जगताप,मच्छिंद्र शिंदे, सुर्यकांत पवार, सीताराम बाठे, विठ्ठल वायाळ, यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. अर्जुनराव खोतकर यावेळी म्हणाले, मराठा समाज एकत्र करून प्रत्येक चळवळीत अग्रभागी असलेले स्वा. सै. रामभाऊजी राऊत यांच्या नावाने होत असलेल्या सभागृहाला आधार देण्याची संधी आपल्याला लाभली असे त्यांनी नमूद केले. मराठा समाजाला लोकप्रतिनिधित्व, पदे देण्यासोबतच न्याय मिळवून देण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केल्याचे सांगून आगामी महापालिका निवडणुकीत मराठा समाजाने एकसंघ रहावे, असे आ. खोतकर यांनी सांगितले.

अंकुशराव राऊत यांनी मराठा समाजासोबतच अन्य गोरगरीब समाजाला सुद्धा मंगलिक कार्यासाठी सभागृह उपयोगी पडेल असे सांगून विष्णू पाचफुले यांना महापौर करावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. विष्णू पाचफुले यांनी समाजाचे देणे लागतो या भावनेने सभागृह उभारणीत आपण खारीचा वाटा उचलला असे सांगून सध्या छोट्या स्वरूपात सभागृह साकारले असले तरी आगामी दोन वर्षात मोठ्या सहान भूखंडाचा शोध घेऊन सुसज्ज सभागृह उभारले जाईल असा मनोदय विष्णू पाचफुले यांनी व्यक्त केला. अभियंता पदवी मिळवल्याबद्दल आशिष पाचफुले यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन ड. अर्जुन राऊत यांनी केले तर राजेंद्र गोरे यांनी आभार मानले. या वेळी मुन्ना गजबी, ओम राऊत, आकाश जगताप,शुभम टेकाळे, हरी नन्नवरे, रमेश शिंदे, आदर्श राऊत, राजेंद्र डुरे, गोविंद गाजरे,राम भुतेकर, राम खांडेभराड,रमेश कवडे,पांडुरंग खैरे, सागर पाटील, आयुष राठोड,राहुल निर्वे, हिरालाल पिपरिये, साईनाथ मोरे,राधाकिसन टिळेकर, यांच्या सह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न हवा- राज्यपाल हरिभाऊ बागडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ जुलै -**

भारतीय पारंपरिक शिक्षण पद्धती जागतिक स्तरावर श्रेष्ठ आहे. देशाची प्रगती ही केवळ शिक्षणामुळे होत असते. ज्ञानदान हे पवित्र कार्य आहे. शिक्षकांनी आपल्या ज्ञानाचा फायदा विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी केला पाहिजे त्यामुळे देश अधिक सशक्त होईल असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाष चंद्र बोस महाविद्यालयात प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्याशी संवाद प्रसंगी केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, संस्थेचे कोषाध्यक्ष कैलासचंद काला, सचिव ॲड. वनिता जोशी,प्राचार्य डॉ.एम वाय. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, डॉ. अर्चना भवानकर, समन्वयक डॉ. मनीष देशपांडे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. वाय. कुलकर्णी यांनी केले. पुढे बोलताना राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे. कुठलेही शिक्षण हे कॉपीमुक्त असले पाहिजे तेच शिक्षण खरे असते. भारत देश सशक्त आणि समृद्ध होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

खा.अशोक चव्हाण म्हणाले की, अभिनव भारत शिक्षण संस्थेने मराठवाड्यात शैक्षणिक गुणवत्तेत उंची गाठली आहे. अनेक गुणवंत विद्यार्थी घडण्याचे काम ही संस्था मागील अनेक वर्षांपासून करत आहे. राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे मराठवाड्याच्या विकासासाठी मोलाचे योगदान राहिले आहे. महाराष्ट्राच्या आणि मराठवाड्याच्या विकासासाठी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची निश्चित मदत राहील अशी अपेक्षा खा. अशोक चव्हाण यांनी बोलताना केली.

खा.अजित गोपछडे आपल्या भाषणात म्हणाले की, राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे नांदेडशी जुने नाते आहे. अनेक माणसे जोडण्याचे काम त्यांनी जनसंघ पक्षाच्या माध्यमातून केले आहे. भारतीय जनता पक्ष वाढविण्यासाठी त्यांचे मोलाचे कार्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, अभिनव भारत शिक्षण संस्था गुणवत्तेत अग्रेसर राहिलेली आहे. विद्यापीठस्तर ते राज्य स्तरापर्यंत विद्यार्थ्यांचा विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेले आहे. याबरोबरच अभिनव भारत शिक्षण संस्था उभारण्यामागचा हेतू स्पष्ट केला.

यावेळी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी, दर्शन जोशी, संभाजी तोटरे, नारायण खंदारे, आदिती केंद्रे, पूजा सुपेकर, उषा सूर्यवंशी, स्वराज बोरगावे, रंजना यादव, अर्चित कोटलवार, सोहम विभुते आदी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष कोटूरवार यांनी तर आभार प्रा. गोपाळकृष्ण सांगवीकर यांनी केले.

**नांदेडशी जुने ऋणानुबंध**

नांदेडशी माझे जुने ऋणानुबंध..!१९६५ पासून माझे नांदेडचे जवळचे ऋणानुबंध राहिलेले आहेत. अनेक वेळा नांदेडला जनसंघाच्या प्रचारासाठी मी आलेलो आहे. पत्रकार म्हणून वार्तांकन करण्यासाठी नांदेडला येण्याची संधी मिळाली होती. आजही मला नांदेडच्या जुन्या मित्रांची आठवण येते. त्यामध्ये बालासाहेब पांडे, सनतकुमार महाजन, भोजालाल गवळी, मदन देशपांडे, डॉ. पुरंदरे, डॉ. जोशी, राम चौधरी, केरबा सावकार बिडवई, आर.डी. देशपांडे, गणपत राऊत, यांच्याशी काम केल्याचे आठवण करून दिली . राष्ट्राच्या उद्धारासाठी या सर्व मित्र परिवारांनी समर्पितपणे कार्य केल्याचा मला अभिमान आहे. केलेल्या कार्याचे फळ आज घडीला पहावयास मिळत आहे.

**नांदेडचे भाग्य..!**

महाराष्ट्रात वडील आणि सुपुत्र हे दोघेजण मुख्यमंत्री होण्याचे भाग्य नांदेडला कै. शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण यांच्या रूपाने पाहायला मिळाले आहे. आणि हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे. ते कोणाच्या वाट्याला मिळाले नाही अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## संक्षिप्त वृत्त

### सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलमध्ये डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती साजरी



**मुदखेड-**शहरातील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे भारताचे माजी गृहमंत्री व महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या कार्याची आणि योगदानाची आठवण करून दिली. त्यांनी शिक्षण, प्रशासन आणि ग्रामीण विकासासाठी दिलेले योगदान अधोरेखित करण्यात आले. त्यांच्या कार्यातून तरुण पिढीने प्रेरणा घ्यावी, असे मत मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे यांनी व्यक्त केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, विजयकुमार बेंबडे शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन टी.बी. पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन सांस्कृतीक विभाग प्रमुख जी.एम. पोगरे यांनी मानले.

### मानव्य विकास मधील तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक



**देगलूर-** येथील मानव्य विकास विद्यालयातील तीन विद्यार्थी महाराष्ट्र राज्य पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता ८ वी) यश मिळवत शिष्यवृत्ती धारक बनले आहेत. त्यांना इयत्ता १० वी पर्यंत शिष्यवृत्ती मिळेल.विशेष म्हणजे हे तिन्ही विद्यार्थी सर्वसाधारण गटातून शिष्यवृत्तीधारक झालेले आहेत. यामध्ये संजना विजयराव मरखेले (जिल्ह्यातून २२ वी), ओमकार किशनराव जाधव(जिल्ह्यातून १२८ वा ), योगेश माधवराव मंगरूळे (जिल्ह्यातून १३९ वा) आला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयातील मुख्याध्यापक संतोष कोल्हे ,उपमुख्याध्यापक श्याम कोल्हे ,पर्यवेक्षक शरद हांद्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुक्रमाबाद येथे अनस वेलनेस व फिटनेस सेंटर चे उद्घाटन



**देगलूर-** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे आरोग्य सल्लागार इसाक बागवान यांच्या अनस वेलनेस व फिटनेस सेंटर चे उद्घाटन जागतिक आरोग्य सल्लागार हरिमामा सोनवणे सर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग दहिफळे सर (आरोग्य सल्लागार) युनुस शेख सर (आरोग्य सल्लागार) मुक्रमाबाद सरपंच प्रतिनिधी बालाजी बोधने, ग्रा.प.सदस्य तथा भाजपा मुखेड तालुका अध्यक्ष हेमंत खंकरे, ग्रा.प.सदस्य जलालोद्दीन सय्यद, प्रतिष्ठित व्यापारी अशोक सावकार वट्टमवार, आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्घाटन प्रसंगी हरिमामा सोनवणे सर बोलताना म्हणाले की आजच्या या धावपळीच्या जीवनात मानवाला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे होत नाही त्यामुळे मनुष्य अनेक आजाराने ग्रासलेला आहे आपल्या धावपळीच्या जीवनातून स्वतःसाठी थोडा वेळ काढून आपले आरोग्य जपण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार रज्जाक कुरेशी यांनी केले तर आभार पत्रकार जलील पठाण यांनी मानले.

### रामराव चौदंते यांचे निधन


**मुदखेड-** मुदखेड शहरातील अशोका नगर येथील रहिवाशी का. रामराव नारायण चौदंते यांचे अल्पशा आजाराने दि. १३ जुलै रोजी रात्री ११ वाजताच्या दरम्यान दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय वर्ष ६१ होते. त्यांचा अंत्यविधी दि. १४ जुलै रोजी शहरातील बौद्ध स्मशानभुमि येथे दुपारी २:०० वाजता करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुलं एक मुलगी, नातू असा मोठा परिवार आहे. प्रकाश चौदंते यांचे ते मोठे बंधू होत.



# घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ जुलै -**

घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून, त्यांच्याकडून दोन लाख ४१ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हि कारवाई दि.१३ जुलै रोजी करण्यात आली.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्य पथकाने धनेगाव चौकातील पुलाखाली छापा मारुन दोन ऑटो ताब्यात घेतले. यात पोलिसांनी मुस्तफा कासिम पठाण, शेख इरफान शेख मुनीर उर्फ मुन्ना दोघेही रा.पानगाव जि.लातूर या दोघांना पोलिसांनी अटक करुन त्यांच्याकडून घरफोडीचे साहित्य, वेल्डींग सेट,दोन ऑटो, मळणी यंत्र आदीसह अन्य साहित्य जप्त केले. या आरोपीविरुध्द लातूर जिल्ह्यातील रेणापूर, बीड जिल्ह्यातील परळी, विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, नागनाथ तुकडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक दारासिंग राठोड, पोहेकॉ. मोहन हाके, सुनिल गटलेवार, मिलिंद नरबाग, श्रीराम दासरे, माधव माने, संघरत्न गायकवाड, उमर शेख यांच्या पथकाने केली.

# वारकऱ्यांच्या वतीने महाप्रसाद

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि.१४ जुलै -**

रबिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील काही विठ्ठल भक्त वारकरी पंढरपूर दर्शनाकरिता आषाढी एकादशीनिमित्त आदमपूर येथून पंढरपूर येथे पायी वारी करीत निघाले होते. गावात पोहोचल्यानंतर पश्चात शनिवार दि.१२ जुलै रोजी वारकऱ्यांच्यावतीने गावात महाप्रसाद वाटप करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील वैष्णव भक्तांचे आराध्य दैवत श्री. क्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल देवस्थान गणले जाते. दरवर्षी लाखों वारकरी पायी वारीने दर्शन घेऊन गावी परततात. आदमपूर येथील वारकरीही पायी वारीने पंढरपूर येथे गेले होते. दर्शन आणि सुखरूप पायी वारी करून आल्यानंतर गावास त्यांनी महाप्रसाद वाटप करीत पुण्य मिळविले आहे.सदरील महाप्रसाद कार्यक्रमास जेष्ठ पुरूष,महिला वारकरी,प्रतिष्ठित नागरिक,बाल गोपाळांनी आस्वाद घेतला आहे.

# बिलोली शहरातील गायरान जमीन धारकांना मिळणार हक्काचे 'घर'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ जुलै -**

बिलोली शहरात गायरान जमिनीवर बेघर मजुर गोर-गरीब मोठ्या प्रमाणात बसलेले असुन त्यांना अद्यापही गायरान जमिनीचे पट्टे व हक्काचे घर मिळाले नसल्याने त्यांनी माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्याकडे शासनाच्या धोरणाविषयी आपली व्यथा मांडली होती,माजी नगराध्यक्षांनी शासनाकडे या संदर्भात सतत पाठपुरावा करुन अतिक्रमीत गायरान धारकांना हक्काचे घर स्वतःच्या नावे मिळावे यासाठी सतत प्रयत्न केले असुन त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे. सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाचे प्रभावी आमलबजावणी करण्याचे निर्देश प्राप्त झाले असुन शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकुल करण्याबाबत निर्देश प्राप्त झाल्याचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांना मिळाले असल्याने अतिक्रमीत गायरान धारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



बिलोली शहरातील देशमुखनगर,भास्करनगर,झोपडपट्टी,इदगाह गल्लीसह विविध भागात गायरान जमीनीवर गेल्या अनेक वर्षापासून गोर-गरीब कुटुंब राहत आहेत. त्यांना शासनाकडुन सदरील जमीनीवरील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात वारंवार नोटीसा दिल्या गेल्या.त्यामुळे हे गोर-गरीब महिला व पुरुषांनी माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्याकडे आपली कैफीयत मांडली होती. कुलकर्णी यांनी गोर-गरीब गायरान धारकांना आपल्या हक्काचे घरे मिळावेत व गायरान पट्टे त्यांच्या मालकीची व्हावीत तसेच या गायरान जागेवर घरकुल योजना मिळावीत यासाठी शासन स्तरावर मंत्रालयात व जिल्हाधिकारी कार्यालयात,उपविभागीय व तहसील कार्यालयात स्वतः जाऊन अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या व शहरातील गोर-गरीबांचे अतिक्रमण नियमित व्हावे यासाठी मोठा पाठपुरावा केला आहे.त्यांच्या या पाठपुराव्यास सोमवारी यश मिळाले असुन माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी,माजी नगराध्यक्ष नागनाथ तुम्मोड,माजी उपाध्यक्ष अनुप अंकुशकर,माजी नगरसेवक प्रकाश पोवाडे,लक्ष्मण शेट्टीवार,गंगाधर पप्पुलवार,सेवानिवृत्त तलाठी माधव जाधव,अर्जुन खंडेराय, महेंद्र गायकवाड,बाबु कुडके,पत्रकार इलियास शेख यांनी उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांची भेट घेऊन सर्वांसाठी घरे-२०२२ अमलबजावणी करण्याची विनंती केली.त्यामुळे गायरान जमिन धारकांना मोठा दिलासा मिळाल्याचे दिसुन येत आहे.

**न. प. ने. गायरानधारकांचे सर्व्हे करून कागदपत्रे सादर करावीत- उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे**

बिलोली शहरात अनेक वर्षापासून अतिक्रमण करुन वास्तव्यास असलेल्या गायरान धारकांना ही जागा नियमीत करुन देण्याचे आदेश प्राप्त झाले असुन त्या अनुशंगाने सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरनेच्या आधीन राहुन गोर-गरीबांना ही योजना मिळण्यासाठी अतिक्रमीत गायरान धारकांचे सर्वे करुन नगरपरिषदेने एका आठवड्यात कागदपत्रे सादर करावेत असे आदेश उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांनी दिले आहे.

# सिडको येथील दीक्षा बुद्ध विहार येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१४ जुलै -**

आषाढ पौर्णिमा व वर्षावास च्या निमित्त सिडको एन.डी. ४१ राहुल नगर येथील दीक्षा बुद्ध विहार येथे पूज्य भदंत बोधिधम्मो यांच्या शुभहस्ते बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

सिडको येथील दीक्षा बुद्ध विहार येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात करण्यात आली याप्रसंगी तथागत भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पूज्य भदंत बोधिधम्मो यांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले ् व उपस्थितताना



पूज्य भदंत बोधिधम्मो यांनी धम्मदेशना देत पंचशील हा जीवन जगण्याचा मार्ग आहे. आई-वडिलांनी मुलावर चांगले संस्कार करणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून विहाराची निर्मिती करणे गरजेचे आहे विहार हे संस्कार केंद्र झाले पाहिजे. म्हणून विहारात धम्म श्रवण रोज केले पाहिजे. यावेळी भदंत बोधिधम्मो यांना धम्मदेशना दिली. नंतर आषाढ पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांना प्रवचन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी बौद्धाचार्य ड. जी.टी.ढगे बौद्धाचार्य अमृत कऱ्हाळे

प्रा. शशिकांत हटकर सामाजिक कार्यकर्ते किशनराव रावणगावकर, प्रल्हाद जोगदंड, भगवान जोगदंड, राघोजी जोगदंड, पांडुरंग नगारे, आनंद थोरात व प्रदीप जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते.

# कृउबा समितीच्या मालकीच्या भूखंडावर परस्पररित्या गाळे बांधकाम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१४ जुलै -**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या भूखंडावर परस्पररित्या विनापरवानगी गाळे बांधून ते भाडेतत्वावर देण्यात आले असून, या प्रकाराची चौकशी करावी, अशी मागणी ॲड.प्रमोद नरवाडे यांच्या मार्फत राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे शेख रऊफ जमिनदार यांनी एका निवेदनाव्दारे सहकारी संस्थेच्या उपनिबंधकाकडे केली आहे.

शहरातील नविन मोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या भूखंडावर २० पेक्षा जास्त गाळ्याचे पक्के बांधकाम करण्यात आले आहे. हे बांधकाम कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व पदाधिकाऱ्यांनी संगनमत करुन केले आहे. आणि प्रशासनाच्या परस्पर ते भाडेतत्वावर अथवा विक्रीखत केले आहे. या गाळे बांधकामाची सखोल चौकशी करुन संबंधितावर कठोर कारवाई करावी तसेच विनापरवाना बांधलेले गाळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुपूर्द करावे, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा ॲड.प्रमोद नरवाडे यांच्या मार्फत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख रऊफ जमीनदार यांनी दिला आहे.

# श्री दत्त शिखर संस्थानच्या घटना नियमावलीत दुरुस्ती करा!

## चिंतामणी भारती महाराज यांचे श्री दत्त शिखर संस्थांन विश्वस्त मंडळाला वकीलामार्फत कायदेशीर सूचनापत्र

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.१४ जुलै -**

श्री दत्तात्रय शिखर संस्थान माहुर ता.माहुर जि. नांदेड हे देवस्थान महाराष्ट्रासह संपुर्ण देशभरातील कोट्यवधी भावीकभक्तांचे श्रध्दा स्थान असून,

सध्याचे घटना नियमावलीनुसार संस्थानचे कामकाज चालते.या घटना नियमावलीत घटना दुरुस्ती,नियम व उपनियम समाविष्ट करुन संस्थानचे कामकाजात सुस्पष्टता, पारदर्शकता आणण्यासाठी कामकाज, व्यवहार, कारभार आधिक सुसुत्रपणे होऊन त्याद्वारे देवस्थानचा विकास जलदगतीने प्रभावीपणे व्हावा व येथे येणाऱ्या भाविकांना अद्यावत सुविधा मिळाव्यात यासाठी महंत गादीच्या चार पारंपारिक घराण्यांच्या वारसांपैकी एक असलेल्या चिंतामणी धनराज भारती महाराज यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यातील तरतुदीनुसार प्रक्रिया सुरू करण्याकरीता संस्थानसह येथील दोन शासकीय अधिकारी विश्वस्तांसह सर्व ०९ विश्वस्तांना विविध १२ सूचनांचे सीपीसीचे कलम ८० नुसार वकीलामार्फत कायदेशीर सुचनापत्र पाठवले आहे.

या सूचनापत्रात नमूद केल्याप्रमाणे सहधर्मदाय आयुक्त औरंगाबाद यांचे न्यायालयातील स्वयंदाखल प्रकरण १२३/१९७७ हे प्रकरण मुंबई विश्वस्त कायदा १९५० चे कलम ५० (अ) (३) अंतर्गत दाखल करण्यात आले. या प्रकरणात आलेल्या आदेशान्वये श्री. दत्त शिखर संस्थानच्या योजनेला मंजुरीचे आदेश पारीत करण्यात आले. सदर आदेश दिनांक १२.०१.१९८८ रोजी पारीत करण्यात आला त्यानुसार श्री. दत्तात्रय शिखर माहुर ता.माहुर जि. नांदेड या सार्वजनिक, धार्मीक संस्थानची नोंदणी मुंबई विश्वस्त कायदा १९५० चे कलम २८ नुसार करण्यात आली. नोंदणी कं ए/२४६ (नदिड) आहे. सद्यस्थितीत हे संस्थान धर्मदाय आयुक्त नांदेड यांचे कार्यक्षेत्रात आहे.

हे संस्थान धार्मीक संस्थान म्हणून नोंदणीकृत असून महंत हे सर्वोच्य प्रमुख आहेत. त्यांचा धार्मीक उत्सव, कामकाज, कारभार इत्यादी बद्दलचा प्रत्येक निर्णय हा अंतीम मानला जातो.त्यात बदल करता येत नाही. सध्याचे घटना नियमावली नुसार संस्थानचे कामकाज चालते. या घटना नियमावलीत घटना दुरूस्ती, नियम व उपनियम समाविष्ट करून संस्थानचे कामकाजात अधिक सुस्पष्टता, पारदर्शीपणा आणण्याकरीता कामकाज व्यवहार कारभार अधिक सुसुत्रपणे होवून त्याव्दारे देवस्थानचा विकास जलदगतीने प्रभावीपणे व्हावा या करीता घटनानियमावलीत दुरूस्ती करणे गरजेचे आहे.आणि त्या दृष्टीने या देवस्थानचे महंत गादीच्या चार पारंपारीक वारस घराण्यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कायदयातील तरतुदीनुसार प्रक्रिया सुरू करण्याकरीता दिनांक ०२.०७.२०२५ रोजी वकील ऍड. चंद्रशेखर शंकराराव शिंदे रा. पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यांचे मार्फत कायदेशिर सुचनापत्र विश्वस्त मंडळाला पाठविले.

दिनांक ०२.०७.२०२५ रोजी सीपीसीचे कलम ८० नुसार वकीला मार्फत पाठविलेल्या कायदेशिर सुचनापत्राची बजावणी संस्थानचे महंत अध्यक्ष मधुसुदन भारती गुरू अच्युत भारती, सचिव डॉ. गणेश तुकाराम ठेंगे पाटील, कोषाध्यक्ष ऍड. नरसिंगराव पावडे, व्यवस्थापक जी.एन. नाईक, विश्वस्त ऍड. आशिष पंजाबराव देशमुख, विश्वस्त अण्णासाहेब त्रंबकराव देशमुख, विश्वस्त डॉ. विश्वासराव जांबुवंतराव माने, जिल्हाधिकारी नांदेड, विश्वस्त तहसिलदार माहुर यांना पाठविण्यात आली. सर्व नोटीसची बजावणी झाली आहे. त्यामुळे श्री दत्त शिखर संस्थान माहुर या धार्मीक स्थळाच्या विकासाच्या दृष्टीने तसेच संस्थानचे व्यवहार व कामकाज अधिक पारदर्शी व निकोप स्वरूपाचे व्हावे या दृष्टीने श्री दत्त शिखर संस्थानचे विश्वस्त मंडळ सकारात्मक दृष्टीने निर्णय घेवून सुचनापत्रामध्ये सुचीत केलेली दुरूस्ती करण्या करीता त्वरेने निर्णय घेतील अशी अपेक्षा महंत गादीचे चार पारंपारीक घराण्यांपैकी एक असलेल्या श्री चिंतामणी गुरू धनराज भारती महाराज यांनी व्यक्त केली आहे.